गुरुवार, २५ ऑगस्ट २०२२
• वर्ष १५ • अंक ३९
www.ramprahar.com
# राम प्रहर
• पाने ८ • किंमत ₹ २ • रायगड

## देशातील सर्वांत मोठ्या रुग्णालयाचे उद्घाटन



**नवी दिल्ली :** फरिदाबाद येथे उभारण्यात आलेल्या देशातील सर्वांत मोठ्या रुग्णालयाचे बुधवारी (दि. २४) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. या वेळी हरियाणाचे राज्यपाल बंडारू दत्तात्रेय, मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर आदी उपस्थित होते. हे खासगी सुपर स्पेशालिटी रुग्णालय २६०० खाटांचे असून सुरुवातीला ५०० खाटांची व्यवस्था केली जाणार आहे. पुढील पाच वर्षांत ते पूर्ण क्षमतेने सुरू होईल. जवळपास १३० एकर जमिनीवर रुग्णालय उभारण्यात आले आहे. हे रुग्णालय अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे. त्यामध्ये केंद्र सरकारकडून एक प्रयोगशाळादेखील चालू करण्यात आली आहे. माता अमृतानंदमयी मठाच्या सहाय्याने सहा वर्षांच्या कालावधीत हे रुग्णालय बांधले गेले आहे.

अंतरंग
मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी/२
शाळेत मीटर नाही, वीज बिल मात्र भरमसाठ!/५
लिजेंड्स लीग क्रिकेटचे वेळापत्रक जाहीर/८

# वाहून जाणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन करणार

## केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांचे प्रतिपादन

**अलिबाग : प्रतिनिधी**

जलजीवन मिशन योजनेसाठी केंद्र सरकारने महाराष्ट्र राज्याला भरपूर निधी दिला आहे. त्यापैकी सात हजार कोटी रुपये शिल्लक आहेत. त्यातून पाणीपुरवठा योजना पूर्ण करता येतील. त्याचप्रमाणे भविष्याचा विचार करून वाहून जाणाऱ्या पाण्याच्या व्यवस्थापनाला प्राधान्य देण्यात येईल, अशी माहिती केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग व जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी (दि. २४) येथे पत्रकार परिषदेत दिली.

ना. प्रल्हादसिंह पटेल हे केंद्रीय मंत्री प्रवास योजनेंतर्गत रत्नागिरी व रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी आढावा बैठक घेतल्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार डॉ. विनय नातू, जिल्हा प्रवक्ता मिलिंद पाटील उपस्थित होते.




(छाया : जितू शिगवण)

केंद्र सरकारतर्फे जलजीवन योजना राबविण्यात येते. या योजनेतून प्रत्येक घरात नळाद्वारे पाणीपुरवठा केला जाणार आहे. २०१९मध्ये महाराष्ट्रात ४९ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणी दिले जात होते. केंद्राने ही योजना सुरू केल्यापासून ७१ टक्के घरांमध्ये नळाद्वारे पाणीपुरवठा केला गेला आहे. उर्वरित काम मार्च २०२४पर्यंत पूर्ण केले जाईल, अशी माहिती ना. प्रल्हादसिंह पटेल यांनी दिली.

रायगड जिल्ह्यात सुरू असलेल्या जलजीवन योजनेची माहिती घेतली. त्यानुसार या जिल्ह्यात आतापर्यंत २४८ गावांमध्ये १०० टक्के घरांत नळाद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. हे काम करताना काही अडचणी येत आहेत. त्यामुळे काम वेगात होत नाही. काही ठिकाणी जागा मिळत नाही, ठेकेदार मिळत नाही. त्यामुळे योजना रखडल्या आहेत. ७१ टक्के काम पूर्ण झाले आहे. मार्च २०२४पर्यंत संपूर्ण जिल्ह्यात काम पूर्ण केले जाईल, असे ना. पटेल यांनी सांगितले. **(पान २ वर..)**



(छाया : अमित जाधव)

**पनवेल : केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या पनवेल येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबीयांनी मंत्रीमहोदयांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी अर्चना ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांचे सुपुत्र अमोघ ठाकूर उपस्थित होते.**

### विधिमंडळाच्या पायऱ्यांवर घमासान

## अंगावर आलात, तर शिंगावर घेऊ!

**शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावलेंचा विरोधकांना इशारा**



**मुंबई : प्रतिनिधी**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान बुधवारी (दि. २४) सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये पायऱ्यांवर वाद झाला. त्यानंतर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. अशातच शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले यांनी अंगावर आलात, तर शिंगावर घेऊ, असा इशारा विरोधकांना दिला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी धक्काबुक्की झाल्याच्या केलेल्या आरोपावर आमदार गोगावले प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

कामकाज सुरू होण्याआधीच सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये संघर्ष झाला. ५० खोके एकदम ओके अन् खाऊन खाऊन माजलेत बोके, अशा घोषणा विरोधकांकडून दिल्या जात होत्या. दरम्यान, सत्ताधारी पक्षाचे आमदार विधिमंडळाच्या पायऱ्यांवर उपस्थित असल्याने विरोधकांनी आमची जागा हायजॅक केल्याचा आरोप केला. यानंतर सत्ताधारी आणि विरोधक आमदार भिडले. या वेळी शिंदे गटातील आमदार महेश शिंदे आणि राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांच्यात वाद झाला.

या संदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना शिंदे गटाचे प्रतोद भरत गोगावले म्हणाले की, आम्ही यांचा सगळा इतिहास बाहेर काढला. कोरोनाचा काळ, सिंचन घोटाळा, नवाब मलिक, अनिल परब यांची वस्तुस्थिती मांडली. आमचे झाल्यानंतर पायऱ्या रिकाम्या केल्या असत्या, पण आम्ही बोलत असतानाच गोंधळ घालत लक्ष विचलित करायचे हा कोणता प्रकार आहे. आम्ही काय बांगड्या भरल्या आहेत का? आम्ही जशास तसे उत्तर दिले आहे. त्यांनी आमचा नाद करायचा नाही, कारण आम्ही कोणाला पाय लावत नाही. चुकून पाय लागला तर आम्ही नमस्कार करू, पण कोणी आम्हाला पाय लावण्याचा प्रयत्न केला तर सोडणार नाही. अंगावर येईल त्याला शिंगावर घेऊ. हा तर फक्त ट्रेलर होता. चित्रपट अजून बाकी आहे, असा इशाराही त्यांनी या वेळी दिला.

## निवडक

### राज्यात लवकरच सात हजार पोलिसांची भरती

**मुंबई :** राज्यात लवकरच सात हजार पोलिसांची भरती करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि. २४) विधानसभेत दिली. लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना ते बोलत होते. विविध शहरांमध्ये पोलीस विभागात मनुष्यबळ कमी पडत आहे. ही आवश्यकता लक्षात घेऊन लवकरच सात हजार पोलिसांची भरती करण्याचे आदेश दिले आहेत तसेच आणखी सात हजार पोलिसांची भरती केली जाईल, असे त्यांनी सांगितले.

### आशिया चषकासाठी व्हीव्हीएस लक्ष्मण हंगामी मुख्य प्रशिक्षक

**नवी दिल्ली :** आशिया चषक स्पर्धेपूर्वी टीम इंडियाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड कोरोना पॉझिटिव्ह आढळल्याने राष्ट्रीय क्रिकेट अकादमीचे प्रमुख व्हीव्हीएस लक्ष्मण संघाचे हंगामी मुख्य प्रशिक्षक असणार आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ही माहिती दिली.

## मुंबई मनपा प्रभाग रचनेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत होणार चौकशी

### मुख्यमंत्र्यांची घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका प्रभाग रचनेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी केली जाणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी (दि. २४) केली, तर या मनपातील गैरव्यवहारांची कॅगकडून चौकशी केली जाईल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबई महापालिकेची नवी प्रभाग रचना चुकीची आहे. २०२१ची जनगणना पूर्ण झाल्यानंतर सदस्यसंख्येत वाढ करणे योग्य ठरेल. दर १० वर्षांनी लोकसंख्येची मोजणी होते आणि त्यानुसार प्रभागाचे क्रमांक वाढवले जातात. २० टक्क्यांच्या लोकसंख्येला आपण सहा प्रभाग वाढवले आणि ३.८ टक्के लोकसंख्येला नऊ प्रभाग वाढवले ही विसंगती आहे. मुंबई पालिकेच्या प्रभाग रचनेविरोधात ८९२ तक्रारी




करण्यात आल्या आहेत. दोषी असेल त्याला पाठीशी घातले जाणार नाही तसेच सूडभावनेने कोणावरही कारवाई होणार नाही.

बरेचसे सदस्य परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा आदेश मिळाला असतानाही इतकी घाई का, असे विचारत आहेत, पण चुकीच्या माहितीच्या आधारे हा आरोप केला जात आहे. वकिलांनी योग्य माहिती न दिल्याने हा संभ्रम निर्माण झाला. आपण कायद्याविरोधात जाऊन कोणताही निर्णय घेणार नाही, असे सांगत मुख्यमंत्री शिंदे यांनी सुप्रीम कोर्टाचा निर्णय वाचून दाखवत आदित्य ठाकरेंवर पलटवार केला.

२२ नोव्हेंबर २०२१ रोजी खानविलकर खंडपीठाने ११ मार्च २०००पूर्वी अस्तित्वात असणारा निवडणूक आयोगाचा कार्यक्रम कायम राहील, असे सांगितले होते. त्या वेळी २२७ प्रभाग होते. यानुसार पूर्वीच्या निवडणुकीतील प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली. राज्याचे प्रभाग पुनर्रचनेचे अधिकारही कायम ठेवले. त्यामुळे नगरपालिका, मनपांच्या निवडणुका १० मार्च २०२२मध्ये असणाऱ्या परिस्थितीनुसारच घ्याव्या लागतीत. म्हणजेच जनगणनेच्या आधाराविना करण्यात आलेली नवीन प्रभागरचना व प्रभाग संख्येतील वाढ सुप्रीम कोर्टाने अद्याप स्वीकारलेली नाही, असे मुख्यमंत्री म्हणाले.

## इगतपुरीत विषबाधेने दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू

**इगतपुरी :** नाशिक जिल्ह्यातील इगतपुरीत असलेल्या मतिमंद आश्रमशाळेत जेवणातून विषबाधा होऊन दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. २४) घडली. इगतपुरीतील अनुसूयातमजा मतिमंद आश्रमशाळेत १२० विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांनी मंगळवारी रात्री जेवण केल्यावर बुधवारी पहाटेच्या सुमारास यातील आठ विद्यार्थ्यांना त्रास सुरू झाला. त्यामुळे त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता यातील दोन हर्षल गणेश भोईर (वय २३, रा. भिवंडी, जि. ठाणे) व मोहम्मद जुबेर शेख (वय ११, रा. नाशिक) या दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला, तर अन्य दोन विद्यार्थ्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. याशिवाय इतर चार विद्यार्थ्यांवर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत.




## पनवेलमधील टेंभोडेत मंगळागौर उत्साहात





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नाच गं घुमा, कशी मी नाचू...?, पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी पिंगा गं पोरी पिंगा..!, अशा गाण्यांवर धम्माल करीत आणि साळुंकी, गाठोडे, लाटा बाई लाटा असे विविध खेळ खेळत पनवेल तालुक्यातील टेंभोडे गावात श्रावण महिन्याचे औचित्य साधून मंगळागौर कार्यक्रमाचे आयोजन मंगळवारी (दि. २३) करण्यात आले होते. भाजप महिला मोर्चाच्या ॲड. प्रतिभा भोईर यांच्या माध्यमातून आयोजित या कार्यक्रमास महिलावर्गाचा प्रतिसाद लाभला.

श्रावण महिना सण, उत्सव, समारंभ घेऊन येतो. हा महिना महिलांसाठीही विशेष असतो, कारण श्रावणात मंगळागौर हा सणही असतो. मंगळागौरीचे व्रत केल्याने नवविवाहितेला अखंड सौभाग्य आणि सुखसमृद्धी लाभते अशी धारणा आहे. म्हणून मंगळागौरीचे व्रत करण्याची परंपरा आहे. श्रावण महिन्यात मंगळागौर हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो.

हनुमान मंदिरात झालेल्या या कार्यक्रमास भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्याचप्रमाणे जि. प. सदस्य अमित जाधव, पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, चिंध्रण ग्रामपंचायतीच्या सरपंच कमला देशेकर, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, डॉ. संतोष आगलावे, महिला मोर्चा तालुका सरचिटणीस लीना पाटील आदी उपस्थित होते.

## नागावमध्ये सात जणांना श्वानदंश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागावमध्ये पिसाळलेल्या कुत्र्याने धुमाकूळ घातला असून सात ग्रामस्थांना दंश केल्याने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

नागाव येथे पिसाळलेल्या कुत्र्याचा उपद्रव वाढला आहे. त्यामुळे ऐन सणासुदीत ग्रामस्थांची चिंता वाढली आहे. अशा परिस्थितीत ग्रामस्थांनी लहान मुलांची काळजी घ्यावी तसेच मदत हवी असल्यास संपर्क साधावा, असे आवाहन ग्रामपंचायतीकडून जारी करण्यात आलेल्या सूचना पत्रात म्हटले आहे. यासाठी ९६५७४५६७१२ हा संपर्क क्रमांकही देण्यात आला आहे.

काही दिवसांपूर्वी उरणमध्येही एका पिसाळलेल्या कुत्र्याने दोन लहान मुलींना चावा घेतला होता.

# प्रकल्पग्रस्तांना जमिनी, घरांचा मालकी हक्क द्या

## आमदार गणेश नाईक यांची विधिमंडळ अधिवेशनात मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**



नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांच्या जमिनी त्याचबरोबर निवासी आणि वाणिज्यिक बांधकामांचा मालकी हक्क प्रकल्पग्रस्तांना तातडीने द्यावा, सिडकोच्या मालकीच्या लिज होल्ड जमिनी फ्री होल्ड करण्याबाबतचा निर्णय घ्यावा त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिकेकडे हस्तांतरीत केलेले व करावयाचे भूखंड विनामूल्य हस्तांतरीत करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी विधिमंडळाच्या सुरू असलेल्या अधिवेशनामध्ये केली.

आमदार गणेश नाईक यांनी बुधवारी (दि. २३) विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये नवी मुंबईकरांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना पुन्हा एकदा वाचा फोडून सिडकोच्या धोरणांवर टीका केली. हा विषय मांडताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही पत्र दिले आहे.

नवी मुंबईत सिडकोने मध्यमवर्गीय व अल्प उत्पन्न गटासाठी अनेक गृहप्रकल्प १९७०च्या दशकात राबविले. त्याला आज जवळजवळ ५२ वर्षे पूर्ण झाली आहेत. प्रचलित दर आकारून गृहप्रकल्पातील सदनिका सिडकोने विकल्या. सदनिका धारकांनी पूर्ण रक्कम सिडकोकडे भरुन घरांचा ताबा घेतला. सदनिका विकल्या, परंतु इमारतीखालील जमिनी ९९ वर्षांच्या लिजवर दिल्या असल्याने जमिनीचा मालकी हक्क सिडकोकडेच राहतो. त्यामुळे सदनिका हस्तांतरीत करणे, विकणे वा इतर व्यवहार करावयाचे असल्यास त्यास सिडकोकडून ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. शिवाय या प्रकल्पातील नोंदणीकृत गृहनिर्माण संस्थांना कन्व्हेयन्स डीड करून घेता येत नाही. त्यामुळे इमारतींचा पुनर्विकास करणे शक्य होत नाही.

सरकारी आणि निमसरकारी प्राधिकरणांना दिलेल्या जागादेखील फ्री होल्ड करण्यात याव्यात. त्याचबरोबर मूळ गावठाणालगत असलेली लीज जमीन तसेच १२.५ टक्के जमीन, एमपीएमसी मार्केटमधील गाळे, दुकाने अशा सर्व प्रकारच्या जमिनी फ्री होल्ड करण्यात याव्यात. सिडकोने ज्या जमिनी अधिकृत केल्या नाहीत त्यासुद्धा जमिनी फ्री होल्ड कराव्यात, सिडकोने संपादित केलेल्या जमिनी आणि नियोजन प्राधिकरण म्हणून जाहीर करण्यात आलेल्या सर्व जमिनी फ्री होल्ड करण्यात याव्यात, तसेच खासगी मालकीच्या जमिनीवर निर्बंध न घालता त्या फ्री होल्ड करण्यात याव्यात, नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्याची जबाबदारी नियोजन प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेची आहे, परंतु नवी मुंबई क्षेत्रातील जमिनी सिडकोच्या ताब्यात आहेत व सिडकोने नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी भूखंड आरक्षित केले आहेत. हे भूखंड महापालिकेकडे हस्तांतरित करतेवेळी सिडको महापालिकेकडून दराची आकारणी करते. शिवाय हे भूखंड महापालिकेकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत न करता कराराने (लिजवर) महापालिकेकडे हस्तांतरीत करते. त्यामुळे भूखंडावरील मालकी हक्क सिडकोकडेच राहतो. हे भूखंड कायमस्वरूपी व विनामूल्य मिळावेत म्हणून महापालिका शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहे, परंतु याबाबतचा अद्याप निर्णय झालेला नाही याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

### *औरंगाबादच्या धर्तीवर फ्री होल्डचा निर्णय घ्यावा*

***औरंगाबाद क्षेत्रात सिडकोने आपल्या लिज होल्ड जमिनी फ्री होल्ड करून दिल्या आहेत. त्याच धर्तीवर नवी मुंबईतील लिज होल्ड जमिनी फ्री होल्ड करुन मिळाव्यात, अशी मागणी आमदार गणेश नाईक यांनी केली.***

# मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी

**गणेशोत्सवात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी उपाययोजना**

**अलिबाग : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव काळात वाहतूक कोंडीची समस्या उद्‍भवू नये यासाठी मुंबई-गोवा महामार्गावर अवजड वाहनांना बंदी घालण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत शासनाकडून विविध सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत.

ज्या वाहनांची वजनक्षमता १६ टन किंवा त्यापेक्षा जास्त आहे अशा अवजड वाहनांना २७ ते ३१ ऑगस्टदरम्यान, पाच व सात दिवसांच्या गणपतीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, काही अंशी परतीचा प्रवास ४ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून ६ सप्टेंबर रात्री ८ वाजेपर्यंत, अनंतचतुर्दशीच्या दिवशी १० दिवसांचे गणपती विसर्जन, परतीचा प्रवास ९ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजल्यापासून १० सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत मुंबई-गोवा महामार्गावर बंदी घालण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने ट्रक, मल्टी एक्सल, ट्रेलर आदी वाहनांचा समावेश असणार आहे. याशिवाय वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांना २७ ऑगस्ट ते १० सप्टेंबरदरम्यान पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे.

दरम्यान, अवजड वाहनांच्या निर्बंधांमधून दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचा गॅस सिलिंडर, लिक्वीड मेडिकल ऑक्सिजन, अन्नधान्य, भाजीपाला आणि नाशवंत माल इत्यादी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणाऱ्या अवजड वाहनांना वगळण्यात आले आहे.

# केंद्रीय मंत्र्यांनी घेतला विविध योजनांचा आढावा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र शासनाच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी योजना राबविण्यात येत असून या योजनांचा लाभ तळागाळातील लाभार्थ्यांना द्यावा, असे प्रतिपादन केंद्रीय अन्नप्रक्रिया, उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी (दि. २४) येथे केले. अलिबाग येथील जिल्हा नियोजन भवन सभागृहामध्ये आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.




या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविंद्र पाटील, माजी आमदार विनय नातू, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, रत्नागिरी जिल्हाधिकारी डॉ. बी. एन. पाटील, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे, पनवेल महापालिका आयुक्त डॉ. गणेश देशमुख, अलिबाग उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अपर जिल्हाधिकारी अमोल यादव, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी -कर्मचारी व विविध योजनांचे लाभार्थी उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्ह्यातील जलजीवन मिशन योजनेच्या सद्य स्थितीबाबत सादरीकरण केले.

या वेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांच्या हस्ते प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेसह विविध योजनेच्या लाभार्थ्यांना लाभवाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया योजनेच्या लाभार्थ्यांनी निर्मित केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन, जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या वतीने मतदार कार्डचे आधार लिंक करण्याबाबत तसेच माझा गणेशोत्सव, माझा मताधिकार या स्पर्धेची माहिती देण्यासाठी व आधार लिंक करण्यासाठी दालन उभारण्यात आले होते. या दालनाद्वारे जवळपास ४१ मतदारांचे आधार लिंक करण्यात आले आहे.

# महावितरणच्या भांडूप परिमंडल कार्यालयाला अधिकाऱ्यांची भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या लेखा परीक्षणासाठी आलेल्या महालेखाकार कार्यालयातील अधिकाऱ्यांनी भांडूप परिमंडळाला भेट दिली. महावितरणच्या विविध उपक्रमाबाबत मुख्य अभियंता भांडूप परिमंडल धनंजय औंढेकर यांच्याशी चर्चा केली.



या वेळी, वरिष्ठ उप महालेखाकार मधुसुधन नायर, वरिष्ठ लेखा परीक्षा अधिकारी जी. एस. मनू, सहा. लेखा परीक्षा अधिकारी आदित्य हेलकर, अजय कुमार पासवान, गौरव गुप्ता उपस्थित होते. मुख्य अभियंता भांडूप परिमंडल धनंजय औंढेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. या वेळी भांडूप परिमंडलाच्या अधीक्षक अभियंता (पायाभूत आराखडा) शुभांगी कटकधोंड उपस्थित होत्या.

वीज वितरण क्षेत्रात दिवसेंदिवस वाढत असलेली विजेची मागणी यामुळे वीज क्षेत्राचे सक्षमीकरण व आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणून महावितरणने स्काडा प्रणालीचा अवलंब केला आहे. या प्रणालीमुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास बिघाड त्वरित शोधता येतो, तसेच त्या ठिकाणी काम करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी वेळही कमी लागतो. या प्रणालीबाबत अधिक माहिती घेण्यासाठी महालेखापाल कार्यालयातील अधिकाऱ्यांनी स्काडा सेंटरला भेट दिली. सहाय्यक अभियंता मिथुन पाटील यांनी स्काडा सेंटर प्रणालीचे सादरीकरण केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि. २४) स्पर्धा परिक्षा कक्षातर्फे आयपीएस कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.



या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड तसेच प्रमुख वक्ते म्हणून प्रा. महेश धायगुडे, प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. नम्रता परिक व प्रा. अंकिता जांगीड हे उपस्थित होते. या कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्ट बँकिंग क्षेत्रामध्ये असणाऱ्या वेगवेगळ्या संधी व बँकिंग परीक्षेचे नियोजन कसे करावे याचे मार्गदर्शन हे होते.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. या कार्यशाळेचे आयोजन प्रा. महेश धायगुडे यांनी केले. प्रा. नम्रता परिक, प्रा. भागयश्री शुक्ला, प्रा. रूपाली नागरेकर यांनी सहकार्य केले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिद्धेश्वर गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# सीकेटी महाविद्यालयात नवीन अभ्यासक्रमाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन ॲनालिटीकल इन्स्ट्रूमेंटेशन या नवीन अभ्यासक्रमाचा शुभारंभ बुधवारी (दि. २४) करण्यात आला.



या वेळी प्रमुख पाहुणे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील उपस्थित होते, तसेच विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. बी. वी. जाधव यांनी उपस्थिती दर्शविली. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे महत्त्व आणि त्यामुळे त्यांना औद्योगिक क्षेत्रात नोकरी मिळवण्यासाठी कसा फायदा होईल, याबाबत माहिती दिली.

विज्ञान शाखा प्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर यांनी या अभ्यासक्रमातील अंतर्भाव घटकांबाबत माहिती दिली. या अभ्यासक्रमात गॅस क्रोमॅटोग्राफी, एचपीसीएल, एफटीआयआर, एएएस यांसारख्या अत्याधुनिक उपकरणे, तसेच क्वॉलिटी कंट्रोल, लॅबॉरेटरी मॅनेजमेंट, लॅबॉरेटरी सेफ्टी याचे प्रशिक्षण समाविष्ट केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रसायनशास्त्र विभागाच्या प्रा. डॉ. सपना चिलाटे यांनी केले, तर विज्ञान संसाधन केंद्राचे समन्वयक महेश भंडारे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पनवेलमधून एक जण बेपत्ता



**पनवेल :** मुंबई येथील नातेवाईकांना पनवेल येथून भेटण्यासाठी गेलेला पती अद्याप घरी न परतल्याने तो हरवल्याची तक्रार त्याच्या पत्नीने पनवेल शहर पोलीस ठाण्यात दिली आहे. मोहम्मद बिलाल उमर कच्छी (वय २८, रा. कच्छी मोहल्ला , पनवेल) असे त्याचे नाव असून रंग गोरा, उंची पाच फूट पाच इंच, चेहरा लांबट, नाक सरळ, केस काळे असून अंगात निळी जिन्स, निळा टीशर्ट, हातात घड्याळ, पायात चप्पल असून त्याला हिंदी, तेलगू भाषा अवगत आहे. डाव्या हाताच्या मनगटावर चरबीची गाठ आहे. सोबत मोबाइल आहे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यासशहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा सहा. पोलीस निरीक्षक शरद ढोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## पर्यावरणपूरक गणपती बनविण्याची ‘रोटरी’तर्फे कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

रोटरी खारघर मिडटाऊनतर्फे पर्यावरणास अनुकूल गणपती बनवायची कार्यशाळा घेण्यात आली. शाडू मातीने पर्यावरणास अनुकूल गणपती बनवायचे प्रात्यक्षिक शीतल वारे यांनी दाखविले.



ही कार्यशाळा गेल्या पाच ते सहा वर्षांपासून ‘रोटरी’तर्फे घेण्यात येते. या वर्षीही कार्यशाळा चार ते पाच ठिकाणी घेण्यात आली. यात खारघरमधील मुर्बी शाळेत कार्यशाळा उत्साहात झाली. १०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभागी होत पर्यावरणास अनुकूल गणपती बनविण्याचा अनुभव घेतला. या वेळी रोटरी खारघरचे अध्यक्ष प्रशांत कालन, सेक्रेटरी अनामिका श्रीवास्तव, प्रोजेक्ट डायरेक्टर अनुप गुप्ता व इतर रोटेरियन उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या कार्यशाळेचे स्तुती करून अशी कार्यशाळा दरवर्षी घ्या, अशी विनंती केली.





**पनवेल भाजपतर्फे**
**जनहितार्थ**
**माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**गुरुवार, दि. २५ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे**
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

**कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स**

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ७. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
- ८. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

- तक्का
- तोंडरे
- नौपाडा
- आसुडगाव
- पेठ/रांजणपाडा
- बेलपाडा विठ्ठल मंदिर

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


## पान १ वरून

### वाहून जाणाऱ्या पाण्याचे व्यवस्थापन करणार

रायगड जिल्ह्यात काही योजनांवर अनेक योजनांमधून खर्च करण्यात आला आहे. काही ठिकाणी पाईपलाईन टाकली आहे, परंतु पाणी नाही. घरांमध्ये नळ आहेत, पण पाणी नाही अशी परिस्थिती आहे. योजना पूर्ण झाल्याचे कागदावर दाखविले जाते असे आपल्या निदर्शनास आणण्यात आले आहे. राज्य शासनाने जे आकडे दिले आहेत त्याची त्रयस्थ यंत्रणेमार्फत खातरजमा केली जाईल. त्याचबरोबर ज्या पाणीपुरवठा योजनांबाबत तक्रारी आल्या आहेत त्याची त्रयस्थ यंत्रणेमार्फत चौकशी केली जाईल आणि दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असे ना. पटेल यांनी स्पष्ट केले.

पत्रकार परिषदेस अलिबाग तालुका अध्यक्ष परशुराम म्हात्रे, शहर अध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष अशोक वारगे, जिल्हा सरचिटणीस सतिश लेले, हेमंत दांडेकर हेही उपस्थित होते.

## पांडुरंग फुंडकर यांच्या स्मृतिग्रंथाचे आज प्रकाशन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रातर्फे दिवंगत कृषिमंत्री, विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते आणि माजी लोकसभा सदस्य पांडुरंग फुंडकर यांचे जीवनकार्य व त्यांच्या विधिमंडळ आणि संसदीय कामकाजाच्या योगदानाची माहिती देणाऱ्या ‘भूमिपुत्र’ या स्मृतिग्रंथाचे प्रकाशन गुरुवारी (दि. २५) मुंबईच्या विधान भवनातील मध्यवर्ती सभागृहात होणार आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महाराष्ट्र विधानसभेचे अक्ष्यक्ष राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते तसेच माजी राज्यपाल राम नाईक, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, विधान परिषद विरोधी पक्षनेता अंबादास दानवे, विधानसभा विरोधी पक्षनेता अजित पवार यांच्या उपस्थितीत होणार आहे.

पांडुरंग फुंडकर यांचे व्यक्तिमत्व अत्यंत समर्पित स्वरुपाचे होते. त्यांनी नेहमी संघटनेला सर्वोच्च स्थान दिले. प्रदीर्घ संसदीय कारकिर्दीत ते विधानसभेवर दोन वेळा, लोकसभेवर तीन वेळा तर विधान परिषदेवर तीन वेळा निर्वाचित झाले होते. या स्मृतिग्रंथात त्यांनी व्यक्त केलेले विचार, त्यांची भाषणे, मान्यवर तसेच स्नेही व पत्रकारांचे लेख, त्यांचे संक्षिप्त जीवनचरित्र त्याचप्रमाणे त्यांच्या निधनानंतर सभागृहातील शोकप्रस्ताव आणि मान्यवरांची आदरांजली यांचा समावेश आहे.

# शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम

## सीकेटी महाविद्यालयात नागरी सुरक्षा कार्यशाळेचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स (स्वायत्त) महाविद्यालयात नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाच्या वतीने २२ ते २६ ऑगस्ट २०२२ याकालावधीत पाच दिवसीय नागरी सुरक्षा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी उरण नागरीसंरक्षण दलाचे सहाय्यक उपनियंत्रक काशिनाथ कुरकुटे आणि शशिकांत शिरसाट हे प्रमुख मार्गदर्शक लाभले आहेत.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी केले. या वेळी नॅशनल कॅडेटस् कौर (एनसीसी) विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. भंडारे उद्धव तुकाराम यांनी कार्यशाळेच्या पाच दिवसांची रूपरेषा सांगितली आणि सहसंयोजक, केअर टेकर ऑफिसर प्रा. निलीमा तिदार यांनी उद्घाटन सत्राचे आभार मानले.

या कार्यशाळेत कॅडेटसना नागरी सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक लष्करी तंत्रज्ञान, अग्निशमन उपाययोजना, प्रथमोपचार,आधुनिक शस्त्रप्रणाली, जैविक-रासायनिक शस्त्रास्त्रे व त्यासंबंधीच्या उपाययोजना, युद्धजन्य परिस्थितीचा सामना कसा करावा इ. विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

या कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील,आय.क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, रुसा समन्वयक डॉ. शैलेश वाजेकर यांनी मार्गदर्शन आणि शुभेच्छा दिल्या. तसेच महाविद्यालयातील सर्व विद्याशाखांचे प्रमुख, विविध विभागाचे प्रमुख आणि सर्व प्राध्यापक वर्गाने या कार्यशाळेच्या आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभाच्या यशस्वी आयोजनासाठी नॅशनल कॅडेटस् कौर विभागाचे प्रमुख प्रो. डॉ. भंडारे उद्धव तुकाराम आणि सहसंयोजक, केअर टेकर ऑफिसर प्रा. निलीमा तिदार तसेच कॅडेटस् यांनी विशेष परिश्रम घेतले.

या कार्यशाळेचे यशस्वी उद्घाटन केल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर आणि सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## कामोठ्यातील लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयात गुणवत्ता मूल्यमापन लेखन स्पर्धा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**



कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये मंगळवारी (दि. २३) पनवेल विभागाचे स्टॅन्डर्ड क्लब ऑफ बीआयएसचे मॅनेजर पुष्पेंद्र मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नववी ते बारावी मधील विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी 'गुणवत्ता मूल्यमापन' लेखनाच्या स्पर्धेचे आयोजन केले होते. ज्यामध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

'होलमार्क' (बीआयएस)बाबत जागृती निर्माण व्हावी व त्याची सुरुवात मुलांपासून व्हावी या हेतूने हा कार्यक्रम घेतला शिवाय गुणवत्ता मूल्यमापन कसे होते ते आवश्यक का आहे याची सर्व माहिती मुलांना दिली. गुणवत्ता 'होलमार्क' ची गरज नव्या पिढीला समजली पाहिजे असे प्रतिपादन शाळेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमासाठी स्टॅन्डर्ड क्लब ऑफ बिसचे डेप्युटी डायरेक्टर आशिष वाकले तसेच सीकेटी ज्युनिअर कॉलेजचे दिनेश पवार हेदेखील उपस्थित होते.

विद्यार्थ्यांना या वेळी रोख रकमेची बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यालयातील शिक्षक वृंद पर्यवेक्षिका व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे नियोजन व मार्गदर्शन मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, पर्यवेक्षक कुसुम प्रजापती व शिक्षिका सरिता सोमानी यांनी केले. या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक हनुमंत भालशंकर, वेदांत काटकर यांनी पटकावला तर द्वितीय क्रमांक अवनीव चौबल, अवनी पोकर तर तृतीय क्रमांकाचे मानकरी अथर्व खोत व श्रेयस नाळे तर उत्तेजनार्थ रिद्धी वाघ व भूमी चिबडे यांनी बक्षीस मिळवले. या व्यतिरिक्त तीन उत्तेजनार्थ बक्षिसे अनुक्रमे निधी लोकरे, सिमरन गमरे, शुभम बांगर व यश म्हामुणकर यांनी पटकावली.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात अ‍ॅडव्हान्स एक्सेल कार्यशाळा

**खारघर : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि. २४) माहिती व तंत्रज्ञान विभागातर्फे 'अ‍ॅडव्हान्स एक्सेल' या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेचे प्रमुख उदिष्टय महाविद्यालयातील प्राध्यापकांना एक्सेल व अ‍ॅडव्हान्स एक्सेल बद्दल सविस्तर माहिती देणे हे होते. कार्यशाळेसाठी बी. के. एक्सेल कळंबोलीचे कॉर्पोरट ट्रेनर बिरू कोळेकर हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. कार्यशाळेमध्ये उपस्थित राहून सर्व प्राध्यापकांनी आणि शिक्षकेत्तर कर्मचारी एक्सेल आणि अ‍ॅडव्हान्स एक्सेल बद्दल महत्त्वाची माहिती आत्मसाद केली. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद गायकवाड यांनी 'एक्सेल'चे सध्याच्या युगात असणारे महत्त उपस्थितांना पटवून दिले.

कार्यशाळेसाठी महाविदयालयाच्या अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षाच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यशाळेचे आयोजन माहिती व तंत्रज्ञान प्रभारी विभाग प्रमुख प्रा. मीनल मांडवे यांनी केले. तसेच प्रा. महेश धायगुडे यांनी बिरू कोळेकर यांचा परिचय करून दिला. तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. पेरणा सातव, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. स्नेहा लोखंडे, नितीन वासकर, अनंत सावंत व सहकारी यांनी सहकार्य केले.

कार्यशाळेचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी शुभेच्छा दिल्या.

## राज्यस्तरीय कला प्रकल्प स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे यश

**खारघर : रामप्रहर वृत्त**

कला चिल्ड्रेन अकादमीतर्फे राज्यस्तरीय आर्ट प्रोजेक्ट स्पर्धा झाल्या. या स्पर्धा सर्व शाळांतून घेण्यात आल्या. या स्पर्धेत खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची विद्यार्थिनी सेजल रामशीष सरोज हिने सहभाग घेऊन रजत कलाकृती पदक मिळविल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले. तसेच मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी सेजल रामशीष सरोज या विद्यार्थिनीचे शाळेत विशेष कौतुक करून अभिनंदन केले.



## सीए कोर्सबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.२३) स्पर्धा परिक्षा केंद्र व मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय सी.ए.फाऊंडेशन कोर्स या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित होते. तसेच वाणिज्य विभागप्रमुख प्रा. नम्रता गजरा यांही प्रमुख वक्ते म्हणुन उपस्थित होत्या. या वेळी त्यांनी उपस्थितांना सी.ए.कोर्सेबद्दल सविस्तर माहिती दिली व विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागातील विद्यार्थी व विद्यार्थीनी मोठ्या संख्येत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. रेवन शिंदे व प्रा. महेश धायगुडे यांनी केले. तसेच महादेव चव्हाण, प्रा. राजश्री म्हात्रे, प्रा. नम्रता पारिक यांनी सहकार्य केले. या वेळी महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता सिदधता कक्षच्या समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे, सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## पनवेल महापालिकेची नियमित लसीकरणाविषयक कार्यशाळा



**पनवेल : प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य संघटनेच्या माध्यमातून पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात नियमीत लसीकरण कृती आराखडा तयार करणे तसेच नागरी नियमीत लसीकरण बळकटी करण्याबाबत मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेमध्ये जागतिक आरोग्य संघटनेचे उच्च वैद्यकिय अधिकारी डॉ. काटकार यांनी मार्गदर्शन केले. या वेळी मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले.

या वेळी आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी, अधिपरिचारिका उपस्थित होते.

या कार्यशाळेमध्ये नियमित लसीकरण कृती आराखडा तयार करण्यासाठी घरोघरी जाऊन सर्व्हे करणे, हाय रिस्क एरिया शोधणे, प्रमाणीत यादी तयार करणे, नकाशे तयार करणे, क्षेत्र सीमांकन करणे याविषयी माहिती दिली. तसेच नियमीत लसीकरणाने बाळांचे, गरोदर मातांचे होणारे बळकटीकरण याविषयी माहिती देण्यात आली.

## पनवेलच्या ओम साई महिला मंडळाचा मुख्यमंत्री शिंदेंना पाठिंबा

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल येथील ओम साई महिला मंडळ या ग्रह उद्योग महिला मंडळाच्या दीडशेहून अधिक सदस्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. यासोबतच राज्य सरकारमार्फत काही प्रश्न सोडविण्याची विनंती केली आहे.

या महिला मंडळाचे प्रश्न समजून घेण्यासाठी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना समर्थन दिल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यासाठी तक्का येथे गणेश वाघिलकर यांच्या निवासस्थानी महिला मंडळाच्या प्रमुख प्रतिनिधींशी शिंदे समर्थक शिवसेनेचे महानगर प्रमुख माजी नगरसेवक अ‍ॅड. प्रथमेश चंद्रशेखर सोमण व तालुका प्रमुख रूपेश ठोंबरे यांनी भेट घेतली. या वेळी त्यांच्याशी चर्चा करून लवकरात लवकर समस्यांचे निराकरण करू, असे आश्वासन प्रथमेश सोमण यांनी दिले.





पनवेल : करंजाडे सेक्टर ३ येथील दुधे विटेवरी कॉम्प्लेक्समध्ये मंगळागौर कार्यक्रम मंगळवारी साजरा झाला. एकूण २५ महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. सोसायटीतील सर्व सदनिकाधारक कार्यक्रम पाहण्यास उपस्थित होते.

## कळंबोलीत आज मोफत कोरोना डोस लसीकरण

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून गुरुवारी (दि. २५) सकाळी १०.३० ते १ वाजेपर्यंत मोफत कोरोना बूस्टर डोस शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यासोबतच कोरोना प्रतिबंधात्मक लसीचा पहिला व दुसरा डोसही मोफत देण्यात येणार आहे.

कळंबोली सेक्टर ८, प्लॉट नंबर १३ सत्यकुंज सोसायटी येथील आमदार प्रशांत ठाकूर जनसंपर्क कार्यालयात या लसीकरण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन भाजपतर्फे करण्यात आले आहे.

## अर्थसाक्षर स्पर्धा : ३२

**निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रश्न क्र. १. भारताला आपल्या गरजेच्या इतकी टक्के इंधनाची आयात करावी लागते?**
***आ.*** ८५ टक्के

**प्रश्न क्र. २. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी फेब्रुवारी २०१९पासून देशातील किती शेतकरी कुटुंबांना मिळतो आहे?**
***ई.*** १० कोटी

**प्रश्न क्र. ३. जगातील सुमारे शंभर देशांना मोटारींची निर्यात करणारी भारतीय कंपनी कोणती?**
***इ.*** मारुती सुझुकी

**अर्थसाक्षर स्पर्धा ३२च्या प्रश्नांना एकाही स्पर्धकाने बरोबर उत्तर दिलेले नाही. त्यामुळे अर्थसाक्षर स्पर्धा ३२साठी एकही विजेता नाही.**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअ‍ॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**
***अ.*** टाटा एलेक्सी ***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)
***इ.*** टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड ***ई.*** टाटा सन्स लिमिटेड

**२. पुढीलपैकी कोणती एक बँक सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी आहे?**
***अ.*** एक्सिस बँक ***आ.*** आयडीबीआय बँक
***इ.*** बंधन बँक ***ई.*** इंडिया ओव्हरसीज बँक

**३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**
***अ.*** १० ***आ.*** ३०
***इ.*** ५० ***ई.*** १००




**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई-स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# पायऱ्यांवर धक्काबुक्की

ज्या विधानभवनामध्ये जनहिताचे कायदे केले जातात, त्या पवित्र सार्वभौम सभागृहाच्या पायऱ्यांवर लोकांनी निवडून दिलेल्या आमदारांनी एकमेकांना शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली ही बाब महाराष्ट्राला निश्चितच शोभादायक नाही.

**जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपल्या प्रतिनिधींना विधिमंडळात लोकांनी निवडून पाठवलेले असते. त्यांच्याकडून जबाबदार वर्तनाची अपेक्षा असते. परंतु बुधवारी सकाळी विधान भवनाच्या पायऱ्यांवर वेगळेच चित्र पाहायला मिळाले. गेले दोन दिवस विरोधी पक्षांच्या आमदारांनी याच पायऱ्यांवर वाईट-साईट शब्दांत सत्ताधाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करून मर्यादाभंग केला होता. 'पन्नास खोके, सगळं ओक्के' किंवा 'पन्नास खोके, माजले बोके' असल्या घोषणा फारशा पचनी पडणाऱ्या नव्हत्या. तरीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांचे समर्थक आमदार व मंत्री शांत राहिले. महाविकास आघाडीच्या हातातून सत्ता गेल्यानंतर त्यांची अवस्था भ्रमिष्टासारखी झाली आहे. सत्ताधाऱ्यांची कोंडी करण्यासाठी विरोधीपक्षांकडे विधिमंडळात नियमांच्या स्वरुपात अनेक अमोघ अस्त्रे उपलब्ध असतात. विरोधीपक्ष नेता कसा असावा याचे उदाहरण देवेंद्र फडणवीस यांनी गेले अडीच वर्ष घालून दिले होते. त्यांचे विधिमंडळातील चातुर्य आणि वर्तन लक्षात ठेवले असते तर महाविकास आघाडीच्या आमदारांना विधानभवनाच्या पायऱ्यांवर बसून अचकट-विचकट शेरेबाजी करण्याची वेळच आली नसती. वास्तविक महाराष्ट्रातील राजकीय वैमनस्य खऱ्या अर्थाने असले तर ते शिवसेनेच्या शिंदे समर्थक गटात आणि ठाकरे समर्थक गटामध्ये आहे. ठाकरे समर्थक आमदारांनी वैफल्यग्रस्ततेतून काही प्रमाणात घोषणाबाजी केली असती तर ते समजून घेण्याजोगे ठरले असते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मिटकरी आणि रोहित पवार यांसारख्या नेत्यांनी घोषणाबाजीत सर्वाधिक उत्साह दाखवला. या घोषणाबाजीचे पर्यवसान अखेर धक्काबुक्कीत आणि शिवीगाळीत झाले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या अमोल मिटकरी यांना सुरूवातीपासूनच काहीबाही शेरेबाजी करून प्रसिद्धीच्या झोतात राहण्याचे कसब साधले आहे. अर्थात अशा वर्तनामुळे प्रसिद्धी वाढते की लौकिक कमी होतो याचे तारतम्य त्यांनीच ठेवणे इष्ट होईल. मिटकरी यांचा स्वभाव आणि त्यांचे राजकारण कुठल्या पातळीचे आहे हे सारा महाराष्ट्र जाणतो अशी कडवट प्रतिक्रिया भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते प्रवीण दरेकर यांनी व्यक्त केली, ती काही उगाच नव्हे. गेले दोन दिवस महाविकास आघाडीचे आमदार विधानभवनाच्या पायऱ्यांवर आरडाओरडा करत होते, तेव्हा सत्ताधारी पक्षाने प्रचंड संयम दाखवला. तेवढी प्रगल्भता महाविकास आघाडीच्या नेत्यांना काही दाखवता आली नाही. मंगळवारी सभागृहामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आमचा अंत पाहू नका, आमच्या सहनशक्तीलाही मर्यादा आहेत अशा कडक शब्दांत इशारा दिला होता. आमदार महेश शिंदे आणि अमोल मिटकरी यांच्यात झालेली धक्काबुक्की बुधवारी मात्र चर्चेचा विषय ठरली. अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्राच्या जनतेला निश्चितच आवडणार नाहीत याचे भान दोन्ही बाजूंनी ठेवणे आवश्यक आहे. गेले अडीच वर्ष महाविकास आघाडीने घातलेल्या घोळांचा हिशेब शिंदे-फडणवीस सरकारने तपासून पाहण्याचे ठरवले आहे. हेच पायऱ्यांवर आरडाओरडा करणाऱ्या विरोधी आमदारांचे खरे दुखणे आहे. आपल्या भानगडी बाहेर येऊ नयेत म्हणून आधीपासूनच कांगावा करण्याचा हा पवित्रा नवा नाही. धक्काबुक्की आणि शिव्यागाळीचे लांछनास्पद प्रकार टाळून सभागृहामध्ये जनतेचे प्रश्न सोडवण्यास साह्य केले तर ते विरोधकांच्याच फायद्याचे ठरेल. परंतु तेवढे तारतम्य महाविकास आघाडीचे आमदार दाखवतील का हा खरा प्रश्न आहे.**

# स्वप्नातील गावांची 'स्वदेस'कडून निर्मिती

**खबरबात**
**शैलेश पालकर**

सन २००४मध्ये प्रदर्शित झालेल्या स्वदेस चित्रपटामधील शाहरूखखान या हिरोने स्वत:च्या गावामध्ये जाऊन विविध योजना कार्यान्वित करून गावाचा विकास साधल्याच्या सत्यकथेवर आधारित जनसहभागाद्वारे खेडेगावांचा विकास करण्याची मानसिकता स्वदेस चित्रपटाचे निर्माते रॉनी स्क्रूवाला आणि जरीना स्क्रूवाला यांच्यामार्फत खेडोपाडी रूजविण्याचा प्रयत्न होत असून सरकारी योजना, नागरिक आणि स्वदेस अशा तिघांच्या संयुक्त सहकार्यातून गावांचा विकास साधला जाणार आहे. स्वदेस फाउंडेशनचे महाप्रबंधक तुषार इनामदार यांनी गेल्या दोन वर्षांपासून स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ड्रीम व्हिलेज संकल्पनेवर काम सुरू असून शासनाकडून गेल्या चार पाच महिन्यांपासून अशी संकल्पना अस्तित्वात आल्याने या उपक्रमाला अधिक चालना मिळाल्याचे सांगितले आहे.



या प्रत्येक गावाची स्वदेस फाउंडेशनच्या टीमकडून मूल्यांकन करण्यात येते व त्यानंतर स्वप्नातील गाव म्हणून त्या गावाला जाहीर करण्यात येते. या यादीमधील मूल्यांकन झालेल्या गावांमध्ये स्वप्नपूर्ती जल्लोष हा कार्यक्रम घेण्यात येऊन स्वदेस फाउंडेशनकडून प्रशस्तीपत्र देण्यात येते. या संकल्पनेमध्ये ड्रीम व्हिलेजचे सुमारे ६३ निकष निश्चित करण्यात आले आहेत. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील ७५ गावांची स्वातंत्र्यदिनाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त निवड करण्यात आली आहे.

पोलादपूर तालुक्यातील १२ गावांचा समावेश या ड्रीम व्हिलेज स्पर्धेसाठी प्राप्त झाला. यापैकी गोळेगणी येरूणकरवाडी, वझरवाडी देऊळवाडी, बोरावळे रानवडी बुद्रुक आणि देवपूरमधील देवपूरवाडी या चार गावांचा ड्रीम व्हिलेज स्पर्धेसाठी समावेश निश्चित झाला आहे. याखेरीज, महाड तालुक्यातील २६ गावांचा, माणगाव तालुक्यातील २४ गावांचा, म्हसळा तालुक्यातील सहा गावांचा, श्रीवर्धन तालुक्यातील पाच गावांचा तर सुधागड तालुक्यातील १७ गावांचा, तळा तालुक्यातील ७ गावांचा सहभाग असा एकूण ड्रीम व्हिलेजमध्ये ९६ गावांनी सहभाग नोंदविला आहे. त्यानुसार गावामध्ये आवश्यकतेनुसार पथदिव्यांची संख्या उपलब्ध आहेत का व हे पथदिवे कार्यान्वित आहेत का? गावामध्ये स्मशानभूमी, दफनभूमी सुस्थितीमध्ये कार्यान्वित आहे का? शासकीय निकषानुसार, सुरक्षित-कार्यरत अंगणवाडी उपलब्ध आहे का? गावामध्ये सुरक्षित व कार्यरत समाजमंदिर उपलब्ध आहे का? गावामधील अंतर्गत सर्व रस्ते पक्के व सुरक्षित आहेत का? (यामध्ये फक्त गावातील सर्व अंतर्गत रस्ते विचारात घ्यावे) सौंदर्यामध्ये सुंदर गाव-बाह्य मदत आणि निधीसह डिझाइन केले जाईल आणि प्रतिगाव विकास समिती काही निश्चित रक्कम म्हणून समाविष्ट केले जावे. सामान्यत: तीन हजार प्रति कुटुंब रूपये एक-दोन लाख शाळेत संगणक प्रयोगशाळा कार्यान्वित आणि कार्यरत आहे का? शाळेत मुली आणि मुलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आणि शौचालय सुस्थितीमध्ये आहे का? गावामध्ये कुठेही उघड्यावर कचरा-सांडपाणी नाही(रस्त्यावर, कुटुंबाभोवताली) गावामध्ये असे कोणी कुटुंब आहे का जे घनकचरा व्यवस्थापन (कचरा विलगीकरण-ओला कचरा व सुका कचरा) करत नाहीत.

गावामध्ये असे कोणी कुटुंब आहे का जे सुक्या कचऱ्याची (प्लास्टिकसह) योग्य विल्हेवाट लावत नाहीत. ओल्या कचऱ्याचे कंपोस्टिंग करत नाही. असे कोणी कुटुंब गावातील सर्व कुटुंबांना कचरा व्यवस्थापनाबाबत प्रशिक्षित आणि जागरूक असले पाहिजे? दर महिन्याला किमान दोन वेळा केले जात आहे. गावामध्ये असे कुटुंब आहे का? ज्यांना वर्षभरासाठी ५० मिटरच्या आत पिण्याचे पाणी उपलब्ध होत नाही? गावामध्ये कोणी उघड्यावर शौचालयास जाते का? गाव विकास समिती (किंवा ग्रीन एसएम)मधील सामुदायिक आरोग्य स्वयंसेवक अंगणवाडी, एच आणि डब्ल्यूसी किंवा पीएचसीशी जोडलेले आहेत का? आरोग्य-प्रथमोपचार किटचा योग्य पध्दतीने वापर व देखभाल केली जाते. सर्व उपकरणे कार्यरत आहेत, औषधे उपलब्ध आहेत का? सर्व पात्र व्यक्ती शासकीय आरोग्य विमा कार्यक्रम अंतर्गत समाविष्ट करणे आवश्यक आहे. ५०टक्के पेक्षा जास्त कुटुंब आर्थिक उत्पन्न वाढ प्रकल्प अंतर्गत सक्रिय आहेत का? ज्या कुटुंबांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे, त्यांच्या उत्पन्नामध्ये दुपटीने वाढ झाली आहे का? (यामध्ये स्वदेस आर्थिक उत्पन्न वाढ प्रकल्प अंतर्गत सहभागी कुटुंब विचारात घ्यावे). ज्या कुटुंबांचे वार्षिक आर्थिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे त्यांच्या उत्पन्नामध्ये दुपटीने वाढ झाली आहे का? (यामध्ये स्वदेस आर्थिक उत्पन्न वाढ प्रकल्प अंतर्गत सहभागी कुटुंब विचारात घ्यावे) जर कुटुंबाचे मूळ उत्पन्न एक लाखापेक्षा जास्त असेल तर त्या कुटुंबाने त्यांच्या उत्पन्नात किमान एक लाख रुपयांची वाढ केली नाही का? (यामध्ये स्वदेस आर्थिक उत्पन्न वाढ प्रकल्प अंतर्गत सहभागी कुटुंब विचारात घ्यावे) गावातील गरीब कुटुंबापैकी किमान ७०टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न ५० हजारांनी वाढले आहे का? गावामध्ये कच्चे घर आहे का? (घरकुल योजनेत नमुद केल्याप्रमाणे निकष आहेत) सर्व पात्र कुटुंबांकडे जॉबकार्ड उपलब्ध आहे व योजनेंतर्गत नोंदणी केली आहे. गावातील सर्व कुटुंबांकडे गॅस कनेक्शन उपलब्ध आहे. स्वयंपाकासाठी लाकूड व चुलीचा वापर केला जात नाही. गावामध्ये असे कोणी पात्र व्यक्ती आहे का, ज्यांना पेन्शन मिळत नाही? गावामध्ये असा कोणी पात्र शेतकरी आहे का ज्यांना किसान क्रेडिट कार्ड मिळाले नाही? १६ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या कोणी मुलाने अथवा मुलीने शाळा सोडली आहे का?(कृपया ० ते १६ वर्ष वयोगटातील सर्व मुलांचा विचार करा) तसेच गावामध्ये सक्रिय म्हणजेच कार्यान्वित शाळा व्यवस्थापन समिती आहे (मूल्यांकनानुसार हिरव्या रंगामध्ये असणे आवश्यक) बँकेमध्ये खाते नाही असे कुटुंब आहे का? शिधापत्रिका-रेशनकार्ड नाही असे कुटुंब आहे का? आधार कार्ड नसलेल्या कोणी व्यक्ती आहेत का? सर्व गाव विकास समिती सभासद यांचे प्रशिक्षण पूर्ण झाले आहे का? गाव विकास समिती मार्फत वणवा निर्मूलनासाठी उपक्रम पूर्ण केला आहे. गावातील प्रत्येक कुटुंबामध्ये सौर दिवे उपलब्ध आहेत. रात्रीच्या वेळी रस्त्यांवर अंधार नसतो, गावामध्ये रस्त्यांच्या कडेला सौरदिवे आहेत. विद्युत वस्तू (दिवे, पंखे, संगणक) वापरण्यासाठी शाळेत सौरऊर्जा पॅनेल आहे का? अंगणवाडीत विद्युत वस्तू (दिवे, पंखे, संगणक) वापरण्यासाठी सौरऊर्जा पॅनेल आहे का? आर्थिक साक्षरता सर्व स्तरावरील प्रशिक्षणामध्ये गाव विकास समितीमधील १०० टक्के सभासद सक्रिय सहभागी झाले आहेत. गावामध्ये स्वच्छता व सुंदर प्रवेशद्वार आहे का? गावामध्ये सामुदायिक वाचनालय उपलब्ध आहे. गावामध्ये जाण्यासाठी पक्का आणि सुरक्षित रस्ता असावा. गावामध्ये बगीचा अथवा क्रिडांगण किंवा खेळण्यासाठी मैदान उपलब्ध आहे का? शाळेसाठी सुरक्षित वॉल कंपाउंड आहे का? शाळेमध्ये आकर्षक रंगचित्रे आणि बोलक्या भिंती आहेत का? शस्त्रक्रियेशिवाय हृदयविकार असलेली कोणी पात्र व्यक्ती आहे का? उपचार न करण्याचे वैध कारण. शासकीय मार्गदर्शक तत्त्वांनुसार श्रवणदोषासाठी उपचार न करता १२ वर्षांखालील कोणतेही पात्र बालक आहे का? उपचार न करण्याचे वैध कारण. असा कोणी मोतीबिंदूचा रुग्ण आहे का ज्याने ऑपरेशन केले नाही? (उपचार न करण्याचे वैध कारण). गाव विकास समिती मार्गदर्शक तत्त्वांनुसार मुलांची चाचणी आणि उपचार अपूर्ण आहेत का? या सर्व बाबींचा विचार यामध्ये केला जाणार आहे.

स्वदेस फाउंडेशनच्या या ड्रीम विलेज संकल्पनेमुळे रायगड जिल्ह्यातील जी गावे स्वप्नातील गाव स्पर्धेत अव्वल ठरतील, अशा गावांचा आदर्श महाराष्ट्रातील अन्य ग्रामीण भागातून घेऊन शासनाच्या योजना व लोकसहभागाला स्वदेस सारख्या नॉन गव्हर्नमेंट ऑर्गनायझेशनची जोड देऊन स्वप्नातील गावांची निर्मिती घडू शकणार असल्याचा विश्वास स्वदेस फाउंडेशनच्या या स्पर्धेमुळे निर्माण झाला आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# थेट चॅट लिस्टमध्ये पाहू शकता येणार स्टेटस्

व्हॉट्स अ‍ॅप हे सर्वात लोकप्रिय सोशल मीडिया अ‍ॅप्स पैकी एक आहे. आपण कितीही व्यस्त असलो तरी आपल्या प्रियजनांशी आपण व्हॉट्स अ‍ॅपवरुन सतत संपर्कात राहतो. व्हॉट्स अ‍ॅप सतत नवनवे फीचर लाँच करत असते, ज्यामुळे वापरकर्त्यांना अधिक सोयी उपलब्ध होतील. फोटो, व्हिडीओ शेअर करण्यासोबतच व्हॉट्स अ‍ॅपवर कॉल आणि व्हिडीओ कॉल करणेदेखील शक्य आहे. यासह वापरकर्त्यांना आकर्षित करणारे आणखी एक फीचर म्हणजे स्टेटस्.



व्हॉट्सअ‍ॅपवर आपण स्टेटस्च्या माध्यमातून फोटो आणि व्हिडिओ शेअर करू शकतो. जे फक्त संपर्क क्रमांक असणाऱ्या किंवा ठराविक निवडलेल्या व्यक्ती पाहू शकतात. हे स्टेटस २४ तासांसाठी उपलब्ध असते. आता याच व्हॉट्समध्ये एक नवे अपडेट जोडण्यात येणार आहे.

WaBetaInfo या वेबसाईटच्या रिपोर्टनुसार लवकरच व्हॉट्सअ‍ॅपमध्ये नवे अपडेट लाँच होणार आहे. या नव्या फीचरमुळे थेट चॅट लिस्टमध्येच स्टेटस् पाहता येणार आहे. व्हॉट्सअ‍ॅपमध्ये चॅट लिस्टमध्ये जिथे प्रोफाईल फोटो दिसतो तिथे क्लिक करुन त्या व्यक्तीचा स्टेटस् पाहता येणार आहे. जेव्हा एखादी व्यक्ती नवा स्टेटस् अपलोड करतील, तेव्हा चॅट लिस्टमध्येच त्यांच्या प्रोफाइल फोटोवर क्लिक करुन ते पाहता येणार आहे. ज्या व्यक्तींना स्टेटस् पाहण्यामध्ये स्वारस्य नाही, अशा व्यक्तींसाठी म्युट पर्याय देण्यात आला आहे. त्यांना सेटिंगमध्ये जाऊन म्युट स्टेटस् अपडेट हा पर्याय निवडावा लागेल, ज्यामुळे स्टेट्सचे चॅट लिस्टमध्ये येणारे नोटिफिकेशन त्यांना त्रास देणार नाहीत.

व्हॉट्सअ‍ॅप वापरकर्त्यांसाठी असे नवनवे फीचर नेहमीच लाँच करत असते. काही दिवसांपुर्वी व्हॉट्सअ‍ॅपद्वारे एक नवे अ‍ॅप लाँच करण्यात आले. ज्यामुळे विंडोजवर व्हॉट्सअ‍ॅप सुरू करणे सहज शक्य झाले आहे. याआधी मोबाईल लिंकद्वारे लॅपटॉपवर व्हॉट्सअ‍ॅप सुरू करता येत होते, पण त्यासाठी सतत मोबाईल जवळ ठेवावा लागत असे. पण आता मोबाईल नसतानाही लॅपटॉपवर सहजरित्या व्हॉट्सअ‍ॅप सुरू करता येणार आहे. सध्याचे युग हे माहितीचे युग बनले आहे. विविध माहिती मिळवत असताना आपल्याला टेक्नीकल बाबींचीही माहिती असणे गरजेचे आहे.

# चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारे आर्मस्ट्राँग

नील एल्डन आर्मस्ट्राँग हे अमेरिकन खगोलशास्त्रज्ञ आणि चंद्रावर पाऊल ठेवणारे पहिले व्यक्ती होते. ते एक एरोस्पेस अभियंता, नौदल अधिकारी, चाचणी पायलट आणि प्राध्यापकदेखील होते. अंतराळवीर होण्यापूर्वी ते नौदलात होते. त्यांचा जन्म ५ ऑगस्ट १९३० रोजी वाकाकोनेटा, ओहायो येथे झाला. त्यांचे निधन २५ ऑगस्ट २०१२मध्ये झाले. त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...



नौदलात असताना त्याने कोरिया युद्धातही भाग घेतला. नेव्हीमध्ये त्याने पुरुडू विद्यापीठातून पदवी संपादन केली आणि त्यानंतर ड्रायडेन फ्लाइट रिसर्च सेंटरमध्ये रुजू झाले आणि चाचणी पथक म्हणून ९००च्या वर उड्डाण केले. येथे सेवा केल्यानंतर त्यांनी दक्षिणी कॅलिफोर्निया विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी मिळवली. नील एल्डन आर्मस्ट्राँग यांच्या वडिलांचे नाव स्टीफन आर्मस्ट्राँग आणि आईचे नाव वियोला लुईस एंजेल होते. वडिल स्टीफन हे ओहायो सरकारसाठी काम करणारे ऑडिटर होते आणि त्यांचे कुटुंब या कारणासाठी ओहायोमधील अनेक शहरांमध्ये गेले.

नील आर्मस्ट्राँग लहानपणी त्यांची सुमारे २० शहरांमध्ये बदली झाली. या काळात नीलच्या हवाई उड्डाणांमध्ये रस निर्माण झाला. जेव्हा नील पाच वर्षांचा होता. त्याच्या वडिलांनी त्याला २० जून, १९३६ रोजी वॉरेन, ओहायो येथे फोर्ड ट्रायमोटर विमानात बसवले आणि नीलने त्याच्या पहिल्या उड्डाणाचा अनुभव घेतला.

१९४७मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी आर्मस्ट्राँगने पुरदूर विद्यापीठात एरोनॉटिकल इंजिनिअरचा अभ्यास सुरू केला. महाविद्यालयात जाणारा ते त्याच्या कुटुंबातील दुसरे व्यक्ती होते. अभ्यास करण्यासाठी त्यांनी मॅसाच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीदेखील स्वीकारले. आर्मस्ट्राँगचा असा विश्वास होता की, आपण कुठेही अभ्यास करून सर्वोत्तम शिक्षण घेऊ शकतो. पहिले जेट विमान उडविले.

नील हे गणित व विज्ञान या विषयात खूपच धारदार होत. त्यांना खगोलशास्त्र आणि विश्वशास्त्रात विशेष रस होता. वयाच्या सोळाव्या वर्षी त्यांनी विद्यार्थी पायलटचा परवाना मिळविला. १९५१मध्ये एकदा युद्धादरम्यान ते उत्तर कोरियावरुन उड्डाण करत होते. त्यांच्या एफ ९ एफ पँथर जेटमध्ये उड्डाण करताना त्यांनी उत्तर कोरियाच्या सैनिकांना त्यांच्या दैनंदिन कामात व्यस्त असल्याचे पाहिले. त्यांनी मशीन गनने त्यांना गोळी मारू शकली असते, परंतु त्याने आपले बोट ट्रिगरवरून काढून पुढे केले. नील आर्मस्ट्राँगचा चंद्राकडे प्रवास-अपोलो११च्या प्रक्षेपणादरम्यान, आर्मस्ट्राँगच्या हृदयाचा ठोका प्रति मिनिट ११० बीट्सपर्यंत पोहोचला. आर्मस्ट्राँगला त्याचा पहिला टप्पा सर्वात गोंगाट करणारा वाटला. आर्मस्ट्राँग रात्री १०.५६ वाजता मून मॉड्यूलमधून बाहेर पडले. ते म्हणाले होते, माणसाचे हे छोटे पाऊल मानवजातीसाठी एक मोठी झेप आहे. त्यांनी चंद्रावर पहिले पाऊल टाकले होते. सुमारे २.३० तास नील आणि एल्ड्रिनने चंद्राचे काही नमुने गोळा केले आणि त्यांच्यावर प्रयोगही केले. त्याने स्वत:च्या पायाच्या चिन्हासहित बरेच फोटो काढले. पृथ्वीवर परतल्यानंतर तिन्ही अंतराळवीरांचे खूप कौतुक आणि स्वागत करण्यात आले. त्यांच्या सन्मानार्थ न्यूयॉर्क शहरात एक परेडही आयोजित करण्यात आली होती. आर्मस्ट्राँगला त्याच्या अतुलनीय कार्यासाठी अनेक कौतुकास्पद पुरस्कार मिळाले आहेत. आर्मस्ट्राँग अनेकदा सार्वजनिक वक्तव्य करणे टाळायचे. करणे सुरू ठेवले. त्याने द-१५ पासून ताशी ४,००० किलोमीटर वेगाने उड्डाण करणारे विमान, रॉकेट, हेलिकॉप्टर आणि ग्लायडर पर्यंत विविध प्रकारची उड्डाणे केली.

## क्लिक...क्लिक...!





**कर्जत: गणेशोत्सव जवळ आला आहे. शाडूच्या मूर्ती तयार झाल्या आहेत. शाडूच्या मातीपासून मूर्ती बनविणे सध्या महाग आहे. तरीही कारागीर हा व्यवसाय करताहेत. (छाया: संतोष पेरणे)**

## आरोग्य प्रहर

# उच्च रक्तदाब असणाऱ्यांनी 'हे' पदार्थ आहारात वापरावेत



उच्च रक्तदाबाची स्थिती हृदयासह मेंदूच्या आरोग्यासाठी देखील हानिकारक असते. त्यामुळे उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी औषध वेळेवर घेण्यासह आहाराची विशेष काळजी घेणे आवश्यक असते. काही काळापूर्वी उच्च रक्तदाबाची समस्या केवळ ज्येष्ठ मंडळींमध्ये आढळून येत असे. परंतु आता युवा पिढीदेखील या आजाराला बळी पडत आहे. एखाद्या व्यक्तीला जर उच्च रक्तदाबाची समस्या असेल तर सुरूवातीच्या काळात याची लक्षणे प्रभावीपणे दिसून येत नाहीत. त्यामुळे अधिक काळजी घेण्याची गरज असते. यासाठी उच्च रक्तदाबाचा त्रास असणाऱ्या व्यक्तींनी आहारात कोणत्या गोष्टींचा समावेश करावा जाणून घ्या याची माहिती.

**पालेभाज्या-** पालेभाज्यांमध्ये पोटॅशियम मुबलक प्रमाणात आढळते. पालक, मेथी, कांद्याची पात यांसारख्या पालेभाज्यांचा आहारात समावेश करावा. पालेभाज्या शरिरासाठी खूपच उपयुक्त असतात.

**बीट-** बीटामध्ये नायट्रिक ऑक्साईड भरपूर प्रमाणात आढळते. हे रक्तवाहिन्यांना अधिक कार्यशील करून रक्तदाब कमी करण्यास मदत होत असते.

**साय नसलेले दुध आणि दही-** साय नसलेल्या दुधामध्ये फॅटचे प्रमाण कमी होते. तसेच दुध कॅल्शियमचा उत्तम स्त्रोत आहे. एका रिसर्चनुसार ज्या महिला एक आठवड्यात पाच पेक्षा अधिक वेळा दह्याचे सेवन करतात, त्यांना उच्च रक्तदाब होण्याची समस्या २० टक्क्यांनी कमी होते.

**केळी-** केळ्यांमध्ये मुबलक प्रमाणात पोटॅशियम आढळते. याशिवाय केळ्यांमध्ये कॅल्शियमदेखील असते जे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास मदत करते.

**डार्क चॉकलेट-** डार्क चॉकलेटमध्ये ६०% कोको असते. तसेच डार्क चॉकलेटमध्ये इतर चॉकलेटच्या तुलनेत साखरचे प्रमाण कमी असते. याच्या नियमित सेवनाने हृदय आणि रक्तवाहिन्यासंबंधी आजरांचा धोका बर्याच प्रमाणात कमी होतो. दरम्यान, सध्याच्या धावपळीच्या जीवनामध्ये आहाराकडे दुर्लक्ष होत चालले आहे. दरम्यान, येथे देण्यात आलेली माहिती घरगुती उपचार आणि सामान्य माहितीवर आधारित आहे. अधिक माहितीकरिता आहार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केंद्र सरकारने केले -केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल




**पेण : प्रतिनिधी**

विविध विकास योजना राबवून समाजातील वंचित, दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केंद्र सरकारच्या माध्यमातून होत असून, त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून भाजपच्या लोकसभा प्रवासातून ग्रामस्थ संवाद साधून त्या त्या भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्याचे काम होणार असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अन्नप्रक्रिया, उद्योग आणि जलशक्ती राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी (दि. २४)पेण येथे केले.

भाजपच्या रायगड लोकसभा प्रवास योजनेदरम्यान केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी पेण शहरातील संत रोहिदास नगर आणि तालुक्यातील वाशी विभाग ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, माजी आमदार विनय नातू, माजी नगराध्यक्षा प्रीतम पाटील, भाजप जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस मिलिंद पाटील, वैकुंठ पाटील, राजेश मपारा, पेण तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, शहर अध्यक्ष हिमांशु कोठारी, माजी उपनगराध्यक्षा वैशाली कडू, माजी नगरसेवक अनिरुद्ध पाटील, शहनाज मुजावर, पूजा पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रल्हादसिंह पटेल यांनी सांगितले की, केंद्र सरकार विविध विकास योजनांसाठी राज्य सरकारकडे निधी उपलब्ध करून देत असते, त्याचा पुरेपूर उपयोग, विनियोग व्हावा या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रत्येक लोकप्रतिनिधींना जनतेच्या भेटी घेऊन व संवाद साधू समस्यांचे निराकरण कशाप्रकारे करता येईल, याकडे लक्ष देण्यास सांगितले आहे. त्याच उद्देशाने मी येथे आलो आहे. रत्नागिरी, रायगडसारख्या छत्रपती शिवाजी महाराज व स्वातंत्र्यवीरांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत मला येण्याचे भाग्य मला लाभले, यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो. पंतप्रधान मोदी यांनी देशाला एक वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले आहे. पंतप्रधान आवास योज़न, ग्रामसडक योजना, अटल पेन्शन योजना, ग्रामीण रस्ते, हर घर नल, जल जीवन मिशन, उज्ज्वला योजना, स्वछ भारत अभियान यासारख्या अनेक लोकहिताच्या योजना आणल्या असून यातून सामान्य नागरिकाला दिलासा देण्याचे काम होत आहे. कोरोना काळात दुसऱ्या देशांना औषधे पाठविण्याचे काम भारताने केले आहे, यातूनच आपला देश प्रगतीकडे वाटचाल करीत असल्याचे दिसत आहे.

सामान्य माणसाला लक्ष ठेऊन केंद्र सरकार काम करीत असून त्यासाठी विविध योजना आणल्या आहेत. त्याची अंमलबजावणी व्हावी, यासाठी आज आपल्या केंद्रीयमंत्र्यांनी येथे भेट दिली. यातून विकासकामे मार्गी लागतील. पेण खारेपाटला दिवसेंदिवस पाण्याचा प्रश्न सतावत असून, तो प्रश्न सोडविण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून ३८ कोटींचा निधी आणण्याचे काम आपण केले आहे. यापुढेही विकासकामे होतच राहतील, त्यासाठी नागरिकांनीही पुढाकार घेणे गरजेचे असल्याचे या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले. केंद्रीयमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांच्या हस्ते या वेळी विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या नागरिकांचा सत्कार करण्यात आला.


(छाया : महेश शिंदे)

## नाते ग्रामपंचायत सदस्यांसह कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**महाड : प्रतिनिधी**

तालुक्यातील महत्वाच्या नाते ग्रामपंचायतीचे दोन सदस्य आणि अनेक महिला व तरुणींनी ॲड. सुरज जामदार यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत भाजपत प्रवेश केला. त्यांच्या या प्रवेशाने नाते जिल्हा परिषद विभागात भाजपची ताकद वाढली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासकामांनी प्रभावीत होऊन महाड तालुक्यातील नाते ग्रामपंचायतीचे सदस्य ॲड. सुरज जामदार व सायली पवार यांच्यासह अनेक महिला व तरुणींनी भाजपमध्ये प्रवेश केला. जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांचे पक्षात स्वागत केले. दरम्यान, जामदार यांनी आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार प्रविण दरेकर यांच्या नेतृत्वाखाली नाते ग्रामपंचायतीमध्ये भाजपचा सरपंच होईल तसेच नाते जिल्हा परिषदेमध्येही आम्ही पक्षाची ताकद वाढवू, असा विश्वास व्यक्त केला.

या वेळी किशोर जामदार, रुपेश पवार, मनोहर पांडे, मोहन काप, बाळकृष्ण वाडकर, राजेंद्र रांजणकर, किरण काप, शांताराम गायकवाड, संजय अंबावले, शशिकांत पांडे, संदिप शिंदे, मुरली पांडे, अरविंद पांडे, श्रीकृष्ण गायकवाड, सुरेश पांडे, मनोज रांजणकर, तुकाराम अंबावले, किरण पवार, सहदेव पवार, दत्ताराम गुडेकर, चंद्रकांत जाधव, सुचित गुडेकर, गणेश अंबावले, महेश अंबिवले, नितीन पवार, प्रविण गायकवाड, प्रभाकर गुडेकर, सुभाष खुटवळ, रमेश झांजे, श्रीधर पांडे, संकेत पांडे, जयंत गायकवाड, विलास गायकवाड, गणेश गायकवाड, रोहित झांजे, आशा जामदार, उज्वल गायकवाड, अर्चना कदम, कविता गायकवाड, प्रिती गायकवार, श्रुती काप, रेखा झांजे, भारती वाडकर, वृषाली पवार, मीना पवार, दिक्षा अंबावले, वर्षा गायकवाड, राजश्री रांजणकर यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, मिलींद पाटील, महिला मोर्चा जिल्हा अध्यक्षा मानकार, तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, उपाध्यक्ष चंद्रजित पालांडे, संदिप ठोंबरे, तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, रुपेश घाडगे, योगेश धामनसे या वेळी उपस्थित होते.

# शाळेत मीटर नाही, वीज बिल मात्र भरमसाठ

### महावितरणच्या पाली विभागाचा भोंगळ कारभार

**नागोठणे : प्रतिनिधी**

महावितरणच्या पाली विभागाअंतर्गत येणाऱ्या बाहेरशिव (ता. रोहा) येथील प्राथमिक शाळेत वीज मीटर नाही, मात्र विजेचे बील येत असल्याने महावितरणच्या पाली विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.

रायगड जिल्हा परिषद शाळा रोहा तालुक्यातील बाहेरशिव येथील रायगड जिल्हा परिषद शाळा कोरोना कालावधीत एप्रिल २०२१पासून शाळा बंद आहे. या दरम्यान शाळा प्रशासनाने विजेची देयके न भरल्याने महावितरणने शाळेचा वीजमीटर काढून नेला आहे. त्यानंतर शाळा प्रशासनाने पुन्हा वीज मीटर घेतलेला नाही. त्यामुळे शाळेमध्ये आजतागायत कोणत्याच प्रकारचा विजपुरवठा झालेला नाही. असे असतानादेखील शाळेला जुलै ते ऑगस्ट २०२२ या महिन्याची वीज देयके पाठवण्यात आली आहेत. या वीज देयकांमध्ये शाळेने वीज वापर केल्याचे दाखवण्यात आले आहे. त्यामुळे जून महिन्यात २०० तर ऑगस्ट महिन्यात ४६० रुपयांचे बील देण्यात आले आहे. याबाबत शाळेच्या मुख्याध्यापिका सविता पाटील यांनी महावितरणच्या पाली (ता. सुधागड) येथील अभियंत्यांना अर्ज लिहून घडल्या प्रकारची माहिती दिली आहे. सदर बील पुन्हा पाठवले जाणार नाही, याची आपण दक्षता घ्यावी व दिलेले बील रद्द करण्यात यावे, अशी विनंती या अर्जात करण्यात आली आहे.


(छाया : राज वैशंपायन)

> **कोरोना कालावधीत शाळा बंद होती. त्या दरम्यान महावितरण कर्मचाऱ्यांनी आमच्या शाळेचे मीटर काढून नेले. आजतागायत आमच्या शाळेला कोणत्याही प्रकारचे वीज मीटर नाही. मात्र वीजबील येत आहे.**
> **-सविता पाटील,**
> **मुख्याध्यापिका,**
> **रायगड जिल्हा प्राथमिक शाळा बाहेरशीव**


## महडजवळ पाताळगंगा नदीत अज्ञात महिलेचा मृतदेह

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील महडजवळ पाताळगंगा नदी पात्रात बुधवारी (दि. २४) सकाळी अनोळखी महिलेचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे.

महड येथे नदीपात्रात महिलेचा मृतदेह तरंगत असल्याची माहिती बुधवारी सकाळी खालापूर पोलिसांना मिळाली. त्याची माहिती मिळताच अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजीक संस्थेचे हनीफ कर्जीकर तातडीने मदत कार्यासाठी पोहोचले. खालापूर पोलिसांचे पथकदेखील घटनास्थळी पोहचले. महिलेचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. मृतदेह बरेच दिवस पाण्यात असल्यामुळे ओळखू न येण्यापलीकडे अवस्था झाली आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आला असून महिलेची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे. अधिक तपास महिला उपनिरीक्षक सरला काळे करीत आहेत.

## ना. प्रल्हादसिंह पटेल यांची पालीत बाईक रॅली



**पाली : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील प्रत्येक योजनेचा उद्देश सफल करण्यासाठी तळागाळात लाभार्थी घटकापर्यंत जाऊन काम करा, असे आवाहन केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी कार्यकर्त्यांना केले.

सुधागड तालुक्यातील पालीतील अष्टविनायक तीर्थक्षेत्री श्री बल्लाळेश्वराचे केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी बुधवारी (दि. २४) दर्शन घेतले. या वेळी भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी बाईक रॅली काढून भाजपचे झेंडे फडकावत त्यांचे स्वागत केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकात जाऊन महाराजांना अभिवादन करण्यात आले. ना. प्रल्हादसिंह पटेल यांनी येथील वावे गावात जनसंघ व विचार परिवार समन्वय सदस्यांशी संवाद साधला.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष राजेश मपारा, तालुकाध्यक्ष दादा घोसाळकर, युवा नेते वैकुंठ शेठ पाटील, सरचिटणीस सागर मोरे, सरपंच श्रद्धा कानडे, गणेश कानडे, रोहा तालुका अध्यक्ष सोपान जांबेकर, सचिन मोदी, आलाप मेहता, शिरीष सकपाळ, केतन देसाई, रोहन दगडे, श्रीकांत ठोंबरे, गणेश सावंत, वैशाली मपारा, आरती भातखंडे, जुईली ठोंबरे, कार्यकर्ते उपस्थित होते.

## खालापुरात एनएमएमटीला ट्रेलरची धडक

**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर बस स्थानकानजीक बुधवारी (दि. २४)सकाळी नवी मुंबई परिवहन सेवेच्या (एनएमएमटी) बसला ट्रेलरने धडक दिली. या अपघातात एनएमटी चालकासह एक प्रवासी किरकोळ जखमी झाला.



एनएमएमटीची बस (एमएच-४३,बीपी-८१५६) बुधवारी सकाळी खोपोली येथून वाशी येथे चालली होती. खालापूर बसस्थानकात प्रवाशी घेतल्यानंतर,बस वळण घेत असताना एनएमटी चालकाने रस्त्याकडे दुर्लक्ष करत बस पोलीस ठाण्यासमोर मुख्य रस्त्यावर आणली. त्यावेळी खालापूरकडून सावरोलीच्या दिशेने जाणाऱ्या ट्रेलरची बसला धडक बसली. चालकाने तातडीने ब्रेक दाबून ट्रेलर नियंत्रित केल्यामुळे मोठा अपघात टळला. या अपघातामध्ये बसच्या खिडकीची काच फुटली. यामध्ये एक विद्यार्थीनी व एनएमटी चालक किरकोळ जखमी झाला. एनएमटी चालकाच्या चुकीमुळे अपघात घडल्याचे प्रवाशांनी सांगितले. जखमी विद्यार्थीनीला खालापूरचे उपनगराध्यक्ष राजेश पारठे व पोलीस कर्मचारी प्रकाश वाढवे यांनी वैद्यकीय मदत केली.

## कोंडगावमध्ये आरोग्य तपासणी शिबिर

**नागोठणे : प्रतिनिधी**

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने नागोठणे विभागातील कोंडगाव ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवारी (दि. २३) आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील कातळावाडी, भपक्याचीवाडी, पायरवाडी, ऐकलघरवाडी, करंजवाडी, बरणीचीवाडी या आदिवासी वाड्यांतील सुमारे शंभरपेक्षा अधिक ग्रामस्थांनी या शिबिराचा लाभ घेतला.




या शिबिरात डॉ. अशिष दुवे, डॉ. नचिकेत पाटील, डॉ. शेळके डॉ. सलमा मुकादम, डॉ. नंदू म्हात्रे, डॉ. अरविंद माटल, डॉ. सुशील सायकर, डॉ. न्यानदिप भोईर, डॉ. प्रतीम सुतार, डॉ. कैलाश सोमवंशी, डॉ. प्रथमेश राणे, डॉ. सुरज सुरळकर इत्यादी १२ डॉक्टरांच्या पथकाने शिबिरार्थींची मधुमेह, रक्तदाब तसेच डोळे, गुडघ्यांची तपासणी केली. कोंडगावचे उपसरपंच अनंत वाघ यांनी आभार मानले

## पोलादपूरच्या सावित्री नदीत रिव्हर राफ्टिंगची ट्रायल

### नरवीर रेस्क्यू टीमचा उपक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील कोलाड येथील रिव्हर राफ्टिंग बंद झाल्यानंतर नरवीर रेस्क्यू टिम तर्फे मंगळवारी (दि. २३) पोलादपूर तालुक्यातील रानबाजिरे धरणापासून लोहारे-तुर्भे पुलापर्यंत रिव्हर राफ्टिंगची चाचणी घेण्यात आली. या वेळी कोलाडचे महेश सानप यांच्या मार्गदर्शनाखाली नरवीर रेस्क्यू आणि ॲडव्हेंचरचे अध्यक्ष रामदास कळंबे, जयेश जगताप, विक्रम भिलारे, दीपक उतेकर, सुमित दरेकर यांच्यासह टिमचे सदस्य उपस्थित होते.


(छाया : शैलेश पालकर)

पोलादपूर तालुक्यात पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार मिळावा तसेच पर्यटन स्थळांचा विकास करण्यासाठी नरवीर रेस्क्यू आणि ॲडव्हेंचरच्या माध्यमातून चळवळ सुरू करण्यात येत आहे. या अनुषंगाने रानबाजिरे धरण ते लोहारमाळ-तुर्भे पुलापर्यंत रिव्हर राफ्टींगची ट्रायल रन घेण्यात आली, असे रामदास कळंबे यांनी सांगितले.


**कागदपत्रे हरविलेबाबत**

श्री. ताजुद्दीन अहमद हुमुले, पत्ता : जेबा अपार्टमेंट, भुसार मोहल्ला, पनवेल यांचेकडून प्रवास करीत असताना खालील कागदपत्र दिनांक २०/५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता कोठेतरी पडून हरवले आहे. त्याबाबत पनवेल शहर पोलिस स्टेशनला दिनांक १८/८/२०२२ रोजी नोंद (रजिस्ट्रेशन नंबर १६५४/२०२२) केली आहे.

**: हरविलेले कागदत्र :**
**ऐमन बिल्डर डेव्हलपर्स व ताजुद्दीन अहमद हुमुले यांच्या नावाचे** CTS No. 399, 402
**दि. २१/१२/१९९९ चे प्रॉपर्टीचे चेन ॲग्रीमेंट**

सदर कागदपत्र जर कुणाला सापडले असल्यास अथवा शोहेबा नासीर बागवान यांचेकडे आणून द्यावे अथवा मोबाईल : ८७७९१९३०६३ या नंबरवर संपर्क साधावा.

**सही/-**
**ताजुद्दीन अहमद हुमुले**



प्रोसेस फी जमा रू. अर्जदारातर्फे वकील कु. सोनिया ना. शिरसाठ

**जाहीर नोटीस**
**पनवेल येथिल मे. दिवाणी न्यायाधिश सो. कनिष्ठ स्तर, पनवेल यांचे न्यायालयात**

दिवाणी चौकशी अर्ज नं. १२६३/२०२२
नि. ८/ड
ने.ता. ३/१२/२०२२

श्रीमती. सुजाता जयवंत कांबळे व इतर १ ......... **अर्जदार**
**विरूध्द**
कोणीही नाही ......... **जाबदार**

सर्व लोकांना या नोटिसद्वारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी, कै. जयवंत पांडुरंग कांबळे यांचे ता. ०७ माहे ऑगस्ट सन २०२१ रोजी फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई येथे मयत झाले असून त्यांचे कायदेशिर सरळ वारस म्हणून अर्जदार श्रीमती. सुजाता जयवंत कांबळे रा. फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेकटर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई यांनी खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसा दाखला मिळणेकरिता अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**फ्लॅट नं. १०१, बी विंग, बिल्डींग नं. ०४, मानसरोवर कॉम्प्लेक्स, सेक्टर नं. ३४, कामोठे, नवी मुंबई.**

वरील अर्जदार हे मयत कै. जयवंत पाडुरंग कांबळे यांचे वारस आहेत, या हक्काबद्दल कोणीही व्यक्तीला हरकत असल्यास, त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्या पासून एक महिन्याच्या आत, या मे. कोर्टात हजर राहून हरकत घेतली नाही तर हे मे. कोर्ट वरील अर्जदार यांच्या अर्जा कामी पुरावा घेण्याची कार्यवाही करील,

तसेच अर्जदार हे कै. जयवंत पाडुरंग कांबळे यांचे वारस असल्याने शाबीत झाले तर त्यांस वारसा दाखला मंजूर करील याची दखल घ्यावी.

आज दि. २४/०८/२०२९ रोजी माझी सही न्यायालयाच्या शिक्कयासह दिली.

सही/- क. लिपिक, दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/- अधिक्षक, दिवाणी न्यायालय व स्तर पनवेल



**जाहिर सुचना**

म.रा.वि.वि.कं.मर्या., पेण मंडळ, पेण अंतर्गत सन २०२२-२३ करीता आय.टी. आय वीजतंत्री (Electrician) ट्रेड मधील ३३ व आय.टी.आय तारतंत्री (Wireman) ट्रेड मधील ३३ अशी एकुण ६६ शिकाऊ उमेदवारांची पदे भरण्यात येणार आहेत. त्याअनुषंगाने, सर्व इच्छुक उमेदवारांना कळविण्यात येते की, **दि. २९.०८.२०२२ ते दि. ३०.०८.२०२२** या कालावधीमध्ये खालील मुळ कागदपत्रांसह, कागदपत्र पडताळणीकरीता पेण मंडळ कार्यालय, अंतोरा रोड, पेण येथे सकाळी **११ ते ०५** दरम्यान उपस्थित रहावे.

**आवश्यक कागदपत्र:**
१. १० वी /१२ वी गुणपत्रक व प्रमाणपत्र.
२. आय. टी. आय सर्व गुणपत्रक व प्रमाणपत्र,
३. जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र,
४. आधार कार्ड व पॅन कार्ड,
५. Apprentice Portal वर ऑनलाईन रजिस्ट्रेशन करून म.रा.वि.वि.कं.मर्या., पेण मंडळ, पेण कार्यालयाच्या Establishment No. E02172700181 वर Apply केल्याची प्रत,
६. बँक पासबुक चे पहिले पान.
७. २ पासपोर्ट साईज फोटो.

**महत्वाच्या सुचना:**
- उमेदवारांची निवड आय.टी.आय च्या ४ सत्रामध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या सरासरीनुसार तसेच, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. बीसीसी/२०२१/प्र.क्र.८३५/१६ ब दि. २५.०२.२०२२ प्रमाणे असलेल्या अरक्षणानुसार करण्यात येईल.
- भरती प्रक्रियेत आवश्यकता भासल्यास कोणताही बदल करण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.
- उमेदवाराने लोकप्रतिनीधी अथवा राजकिय व्यक्तींकडुन दबाव अणल्यास त्यांची उमेदवारी रद्द करण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीकारांना राहतील.
- अपुर्ण कागदपत्र असलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी तसेच, उमेदवारांनी दुरध्वनीद्वारे कोणत्याही अधिकारी/कर्मचाऱ्यास संपर्क करु नये.
- सदर प्रक्रिया ही रायगड जिल्हयासाठी मर्यादित आहे.

**(इ.अ. मुलाणी)**
**अधिक्षक अभियंता, पेण मंडळ, पेण.**



RELIANCE HOSPITAL
Every Life Matters
NAVI MUMBAI

आता आहे

Kokilaben Dhirubhai Ambani hospital
NAVI MUMBAI
Every Life Matters

आमच्या आरोग्य सेवेची पुनर्व्याख्या
आमचा ठसा मजबूत करत आहे

EMERGENCY +91 22 7198 1111
APPOINTMENTS & BOARD LINE +91 22 7197 9797

Thane-Belapur Road, Opp Koparkhairane Station, Navi Mumbai – 400 710, India; navimumbai.kokilabenhospital.com /KDAHNaviMumbai

# तरुणांनो आपले लक्ष्य मोठे ठेवा, जगावर राज्य कराल!

## केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांचे प्रतिपादन





(छाया : महादेव सरसंबे)

**रोहे : प्रतिनिधी**


तरुणांनी भविष्याचा विचार केला पाहिजे. भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी केवळ नोकरीवर अवलंबून न राहाता आपले लक्ष्य मोठे ठेवल्यास तुम्ही जगावर राज्य कराल, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी मंगळवारी (दि. २३) रोह्यातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात केले.

भारतीय जनता पक्षाच्या रायगड लोकसभा प्रवास योजनेदरम्यान मंगळवारी रोह्यात झालेल्या युवा मतदार संवाद या कार्यक्रमात ना. प्रल्हादसिंह पटेल मार्गदर्शन करीत होते. भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी आमदार विनय नातू, भाजप युवा मोर्चा रायगड जिल्हा अध्यक्ष अमित घाग, रवी मुंडे, वैकुंठ पाटील, राजेश मापारा, मारुती देवरे, राजेश डाके, कृष्णा बामणे, रोशन चाफेकर आदी या वेळी व्यासपिठावर उपस्थित होते.

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील २० टक्के कारखाने बंद पडले आहेत. त्यामुळे बेरोजगारी वाढली आहे. तरुणांना काम मिळत नाही. आपण स्टार्ट अप इंडिया अंतर्गत या ठिकाणी कारखाने सुरू करावेत, तसेच स्पर्धा परीक्षा केंद्र व औद्योगिक क्षेत्रात उद्योग केंद्र सुरू करावेत, अशी मागणी या वेळी भाजप युवा मोर्चा जिल्हा अध्यक्ष अमित घाग यांनी ना. प्रल्हादसिंह पटेल यांच्याकडे केली.

या वेळी उपस्थित तरुणांनी केंद्र सरकारच्या विविध योजनांतील अडचणी, बँकेचे असहकार, तसेच गड, दुर्गाविषयी पुरातन विभागाची उदासीनता या विषयीचे प्रश्न उपस्थित केले. या कार्यक्रमाला रोहा तालुक्यातील तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संततधार पावसामुळे बाजारात शुकशुकाट



(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

गणेशोत्सव तोंडावर आला असताना कर्जत तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाची रिपरीप सुरू आहे. त्यामुळे गणेशोत्सवासाठी होणाऱ्या खरेदीवर विरजण पडले आहे. पावसाच्या सततच्या रिपरिपीमुळे बाजारात शुकशुकाट दिसत असून, व्यापारीदेखील संकटात आले आहेत.

गणेशोत्सवाची तयारी किमान १५दिवस आधी सुरु होते. यंदा शासनाने सण, उत्सव साजरे करण्यावरील निर्बंध हटवले आहेत. त्यामुळे गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यासाठी भक्तांची लगबग सुरु आहे.गणेशोत्सवापुर्वी दोन–तीन आठवडे खरेदीसाठी गर्दी होणार या हिशोबाने व्यापाऱ्यांनी देखील आपले नियोजन केले होते. किराणा सामान, कपडे आणि सजावट साहित्य यांची दुकाने फुलली आहेत. मात्र मंगळवार (दि. २३)पासून सुरु झालेली पावसाची रिपरिप बुधवारीदेखील सुरूच आहे. पाऊस थांबत नसल्याने गणेशभक्त खरेदीला निघालेला दिसत नाही. त्यामुळे तालुक्यातील कर्जत, नेरळ, कशेळे, कडाव, कळंब या बाजारपेठांत शुकशुकाट पाहायला मिळत आहे. ग्राहक फिरकत नसल्याने व्यापारीदेखील हवालदिल झाले आहेत.

पावसाची रिपरिप थांबली तर खरेदीसाठी लोक बाहेर पडतील, असे व्यापारी सांगतात, मात्र पाऊस थांबण्याचे नाव घेत नाही. गणेशोत्सव आठ दिवसांवर येऊन ठेपला आहे. मात्र बाजारातील शुकशुकाट पाहून व्यापारी हवालदिल झाले आहेत. पाऊस असाच राहिल्यास खरेदीवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार आहे.


**थर्माकोल बंद झाल्यामुळे गणेशोत्सवात भक्तांकडून विद्युत रोषणाई केली जाते. आमच्याकडे पूर्वी महिनाभर आधी ग्राहक येण्यास सुरुवात होत असे. मात्र यावर्षी आठ दिवसांवर सण आला तरी भक्तांची खरेदीसाठी गर्दी दिसून येत नाही.**
**–ललित जैन, सागर इलेक्ट्रिकल, नेरळ**

**गणेशोत्सव म्हटला की, प्रत्येक घरातील व्यक्ती किमान लहान मुलांना तरी नवीन कपड्यांची खरेदी करण्यासाठी बाजारात येत असते. यावर्षी बाजारात मोठी मंदी दिसत असून, निदान शेवटचे दोन–तीन दिवसतरी गर्दी होईल, अशी अपेक्षा आहे.**
**–कौशिक वांजळे, रेडिमेड कपडे विक्रेते, कर्जत**

# खालापुरातील अन्य प्रदूषणकारी कारखान्यांचे काय?

## प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका गुलदस्त्यात





(छाया : विनायक माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

जलप्रदूषण केल्यामुळे खालापूर तालुक्यातील 'उत्तम स्टील'च्या व्यवस्थापनाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारखाना बंद करण्याची नोटीस दिली आहे. ही नोटीस स्वागतार्ह असली तरी या कारवाईसाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाला दोन वर्षाचा कालावधी का लागला, याचे उत्तर मिळणे अपेक्षित असून, भू, जल, वायू प्रदुषण करणाऱ्या तालुक्यातील अन्य कारखान्याबाबतही प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाईची भूमिका घ्यावी, अशी मागणी होत आहे.

उत्तम स्टील कारखान्याचे सांडपाणी थेट परिसरातील विहीरी आणि ओढ्यात गेल्याने सप्टेंबर २०२० मध्ये जलप्रदूषणाची मोठी समस्या निर्माण झाली होती. त्यावेळी खालापूर पंचायत समितीच्या तत्कालीन सभापती वृषाली पाटील यांनी स्थानिक ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्यासह कारखान्यावर हल्लाबोल केला होता. मात्र प्रदूषण नियंत्रण मंडळ त्यावेळी हाताची घडी घालून बसल्याने कोणतीच कारवाई झाली नाही.

नदी काठच्या कारखान्यांपैकी हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे कारखाने सोडले तर अनेक कारखान्यांची सांडपाणी विल्हेवाट लावण्याची यंत्रणा नाही. याशिवाय सांडपाणी नियोजनाची मानसिकता नसलेले कारखाने नदीच्या पाण्यात रासायनीक सांडपाणी सोडून देतात. तर काही काही कारखाने रात्रीच्या वेळी टँकरद्वारे नदीत सांडपाणी सोडत असल्याचे अनेकदा समोर आले आहे. नदी पात्रात सोडण्यात येणाऱ्या रासायनीक सांडपाण्यामुळे खालापूर तालुक्याची जीवनदायिनी असलेल्या पाताळगंगा नदीच्या पाण्याने प्रदूषणाची परमोच्चता गाठली आहे.

पाताळगंगा नदी किनारी असलेली गावे व वाड्या आजही दैनंदिन वापराकरिता लागणाऱ्या पाण्यासाठी पाताळगंगेची वाट पकडतात. या नदीतील मासेमारीवर उपजाविका करून जगणारे शेकडो कुटूंबे खालापूर तालुक्यात आहेत. मात्र नदीच्या प्रदुषीत पाण्यामुळे अंगावर पुरळ, खाज यासारखे प्रकार नियमीत घडत आहेत. उग्र वासामुळे गुरेढोरेदेखील नदीच्या पाण्याला तोंड लावत नाहीत. नदीतील जलचरही धोक्यात आले आहेत.

सह्याद्रीच्या डोंगररांगातून उगम पावलेली पाताळगंगा नदी खोपोलीतील गगनगिरी मठाला वळसा घालून खालापूर, पेण आणि पनवेल तालुक्यातून पुढे खाडीला मिळते. सुमारे चाळीस किलोमीटरचा प्रवास करणाऱ्या या नदीच्या पाण्यावर अनेक पाणी योजना उभारल्या आहेत. या पाणी योजनांद्वारे शेकडो गावांत पाताळगंगेचे पाणी पोचते. मात्र जलप्रदुषणामुळे तेथील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पाताळगंगा नदीत रासायनीक सांडपाणी सोडणाऱ्या कारखान्यांची तपासणी करून कारवाई करावी, अशी मागणी वेळोवेळी केली जात असून प्रदूषण नियंत्रण मंडळ मात्र अस्तित्वात नसल्यासारखी परिस्थिती आहे. पर्यावरणासाठी अनेक संस्था काम करीत असताना मात्र त्यांचेही पाताळगंगा नदीकडे दुर्लक्ष होत आहे.

**पाताळगंगा नदी पात्रात रासायनीक सांडपाणी सोडण्याच्या घटना अनेकवेळा घडल्या आहेत. मात्र पंचनामे करणे, पाण्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविणे या पलिकडे काहीच होत नाही. अनेकदा प्रदूषण नियंत्रण मंडळ अस्तित्वात आहे की, नाही असा प्रश्न पडतो.**
**–सुरेश गावडे, माहिती अधिकार कार्यकर्ता,चौक, ता. खालापूर**

# पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात सलाईनचा तुटवडा



**महाड : प्रतिनिधी**

रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी असलेल्या पाचाड गावातील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात गेल्या काही दिवसांपासून काही औषधे आणि सलाईनचा तुटवडा भासत आहे. यामुळे परिसरातील रुग्णांना पैसे खर्च करून खाजगी दवाखान्यात जावे लागत आहे. जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या औषधपुरवठा विभागाकडून अल्प प्रमाणात सलाईनपुरवठा होत असल्याचे समोर आले आहे. रुग्णसंख्या वाढली असतानाही पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्राला महिनाभराकरिता केवळ ५० सलाईनचा पुरवठा केला जात असल्याची माहिती देण्यात आली आहे.

महाड तालुक्यातील पाचाड येथे गेल्या अनेक वर्षांपासून रायगड जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत आहे. पाचाड, रायगडवाडी, नेवाळी, हिरकणीवाडी, पुनाडे, सांडोशी, सावरट, कोंझर, कोथुर्डे, वाळसुरे, छत्री निजामपूर आदी गावातील रुग्णांना या ठिकाणी आरोग्य सुविधेचा लाभ घेता येतो. किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवप्रेमींनादेखील या प्राथमिक आरोग्य केंद्राचा फायदा होत आहे. या परिसरात खाजगी दवाखाने नसल्याने गरोदर महिलांनादेखील प्रसूतीसाठी या प्राथमिक आरोग्य केंद्राचा आधार होतो. मात्र गेल्या काही वर्षांपासून या ठिकाणी अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक रुग्णांना पदरमोड करून उपचारासाठी महाड शहरात जावे लागत असल्याची माहिती ग्रामस्थ अमर सावंत यांनी दिली.

पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी उपलब्ध असले तरी औषध साठा पुरेसा नसल्याने रुग्णांना महाड शहरातील अन्य दवाखान्यात जावे लागत आहे. गेले काही दिवस या केंद्रात सलाईनचा तुटवडा भासत आहे. पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्राकडून महाड पं.स.चे तालुका आरोग्य अधिकारी तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे ३ ऑगस्टच्या लेखी पत्रान्वये वाढीव औषधांची मागणी करण्यात आली आहे. मात्र याला अद्याप प्रतिसाद न मिळाल्याने रुग्णांचे मात्र हाल होत आहेत.

पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्राअंतर्गत नाते, अचाळोली, कोंझर आणि निजामपूर अशी चार उपकेंद्र आहेत. जवळपासचे सुमारे १४ हून अधिक गावांमधील रुग्ण या उपकेंद्रात उपचारासाठी येतात. पावसाळ्यात अतिसार, कॉलरा, कावीळ, विविध प्रकारचे ताप आदी साथीचे रुग्ण तर किल्ले रायगडावर येणारे पर्यटकदेखील तेथे दाखल होतात. सद्य स्थितीत या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रतिदिन ८० हून अधिक रुग्ण येत आहेत. रुग्णांना सलाईन देणे गरजेचे असते. मात्र जिल्हा औषधपुरवठा विभागाकडून अल्प प्रमाणात सलाईनपुरवठा होत असल्यामुळे पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रातील सलाईन अल्पावधीतच समाप्त होत आहेत. हा विषय स्थानिक नागरिकांनीदेखील सोशल मीडियावर ताणून धरला असून रुग्णांना सुविधा मिळावी, अशी त्यांची मागणी आहे.

**राजिप आरोग्य विभागाकडून संपूर्ण जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात औषध पुरवठा होतो. पाचाड प्राथमिक आरोग्य केद्राला दरमहा ५० सलाईन दिल्या जातात. रुग्णसंख्या वाढल्यास संबंधित रुग्णालयाने रुग्ण कल्याण समितीमधून खरेदी करणे आवश्यक आहे.**
**–श्री. चौधरी,**
**रायगड जिल्हा आरोग्य विभाग, अलिबाग**

**पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्रात सलाईन, कांही औषधे उपलब्ध नसल्याने ऐन पावसाळ्यात उद्भवणाऱ्या स्थितीला सामोरे जाताना नागरिकांना आणि वैद्यकीय अधिकाऱ्यांना कसरत करावी लागत आहे. औषध तुटवड्यामुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड देखील बसत आहे. यामुळे औषध पुरवठा वेळेवर होणे गरजेचे आहे.**
**–लहू औकीरकर, ग्रामस्थ, पाचाड, ता. महाड**

**गेले काही दिवस रुग्णसंख्या वाढली आहे. यामुळे उपलब्ध औषधसाठा अपुरा पडत आहे. राजिप आरोग्य विभागाकडे औषध पुरवठा करण्याची मागणी केली आहे.**
**– डॉ. सृष्टी शेळके, वैद्यकीय अधिकारी, पाचाड प्राथमिक आरोग्य केंद्र**

# मुरूडमधील शिबिरात ५६ जणांचे रक्तदान



(छाया : संजय करडे)

**मुरूड : प्रतिनिधी**

समाजसेवक डॉ. सनाउल्लाह घरटकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून मुरूडमधील संजीवनी आरोग्य सेवा संस्था आणि जिल्हा रुग्णालय रक्तपेढी–अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि. २४) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ५६ जणांचे रक्तदान केले.

मुरूड नगर परिषदेचे प्रशासक पंकज भुसे व रक्तपेढी प्रमुख डॉ. दीपक गोसावी यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन करण्यात आले. डॉ. मकबुल कोकाटे, संजीवनी संस्थेचे कार्याध्यक्ष विजय सुर्वे, प्राचार्य डॉ. नगरबावडी, डॉ. संजय पाटील, चंद्रकांत अपराध, राशीद फहीम, आदेश दांडेकर, शशिकांत भगत, किर्ती शहा, अजित कारभारी, शकील कडू, जाहिद कादिरी, डॉ. अनंत जोशी आदी मान्यवर या वेळी उपस्थित होते. तरक्षक दलाचे जवान, महाविद्यालयीन विद्यार्थी, संजीवनीचे पदाधिकारी व कर्मचारी तसेच नागरिकांनी शिबिरात रक्तदान केले. सुनील बंदीछोडे, श्रेयस पाटील, आकाश सावंत, उमेश पाटील व संजीवनीच्या कर्मचाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

## कर्जतच्या तहसीलदारपदी डॉ. शीतल रसाळ

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे तहसीलदार विक्रम देशमुख यांची ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात बदली झाल्याने त्या जागेवर डॉ. एस. आर. तथा शीतल रसाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. रसाळ हे पूर्वी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यरत होते. त्यापूर्वी त्यांनी सिंधुदुर्ग, बुलढाणा जिल्ह्यामध्ये सुद्धा काम केले आहे.

# रेवदंड्यात दिमाखदार पालखी सोहळा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

शहराचे आराध्य दैवत श्री मारूतीरायाचा पालखी सोहळा नुकताच संपन्न झाला, या दिमाखदार पालखी सोहळ्यात रेवदंडा ग्रामस्थ व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

श्रावण महिन्यात रेवदंडा पारनाका येथील श्री मारूती मंदिरात सात दिवस पारंपरिक भजन सप्ताहाचे आयोजन केले जाते. या सप्ताहात भाविक, ग्रामस्थ श्रध्दा व भक्तीने श्री मारूती मंदिरात दर्शनाचा लाभ घेतात. त्यामुळे सकाळी व सायकांळी मंदिरात भाविकाची गर्दी असते. या भजन सप्ताहाच्या समाप्तीनंतर रेवदंडा शहरातून श्री मारूतीरायाच्या पालखी सोहळ्याचे आयोजन केले जाते. या वर्षी मंदिरापासून रेवदंडा शहरात वाजतगाजत, भजनाच्या जल्लोषात श्री मारूतीरायांची पालखी काढण्यात आली होती. या पालखी मिरवणुकीत ग्रामस्थांसह पंचक्रोसीतील भाविक सहभागी झाले होते. शहरातील गल्लोगल्लीत पालखीचे स्वागत करण्यात आले. पालखी मार्गात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. सायकांळी पारनाका येथील मंदिरात पालखी सोहळ्याची झाली. हा पालखी सोहळा यशस्वी करण्यासाठी श्री मारूती मंदिर देवस्थान पंचकमिटी तसेच अष्टोप्रहार भजन मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# माजी सैनिक आणि विधवांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना; अर्ज सादर करण्याचे आवाहन

**अलिबाग : जिमाका**

सन २०२१–२२ मध्ये दहावी, बारावी, पदवी, पदविका परीक्षा किमान ६० टक्के गुणांनी उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षण घेणाऱ्या तसेच विद्यापीठाने मान्य केलेल्या विषयांमध्ये संशोधनपर अभ्यासक्रम करणाऱ्या (पीएचडी व तत्सम) माजी सैनिक/विधवांच्या पाल्यांना शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३मध्ये प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमासाठी अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत दरवर्षी शैक्षणिक शिष्यवृती देण्यात येणार आहे.

या कामी माजी सैनिक/माजी सैनिक विधवांनी वैयक्तिक अर्ज, डीडी–४० अर्ज (कार्यालयात उपलब्ध आहेत), ओळखपत्राची छायांकित प्रत, सध्या पाल्य ज्या वर्गात शिकत आहे, त्या वर्गाचे बोनाफाईड सर्टीफिकेट,उत्तीर्ण झालेल्या वर्गाच्या गुणपत्रिकेची प्रमाणित सत्यप्रत, डिस्चार्ज पुस्तकातील कुटूंबातील सदस्यांची नावे असलेल्या पानांची प्रमाणित छायांकित प्रत, इतर कोणतीही शिष्यवृती मिळत नसल्याबाबतचा कॉलेजचा दाखला या कागदपत्रांसह आपले अर्ज १० ऑक्टोबर २०२२ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, रायगड–अलिबाग येथे सादर करावेत.

या संधीचा रायगड जिल्ह्यातील पात्र माजी सैनिक/माजी विधवांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी डॉ. पद्मश्री एस. बैनाडे यांनी केले आहे

# दिग्गज क्रिकेटपटू उतरणार मैदानात

## लिजेंड्स लीगचे वेळापत्रक जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लिजेंड्स लीग क्रिकेटच्या दुसर्‍या सत्राचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. भारतात होणार्‍या दिग्गज माजी क्रिकेटपटूंच्या या लीगमधील सामने कोलकाता, नवी दिल्ली, कटक, लखनऊ आणि जोधपूर या शहरांमध्ये खेळवले जातील. या क्रिकेट लीगमध्ये पाकिस्तानचे क्रिकेटपटू खेळणार नाहीत.

लीगचे पहिले तीन सामने कोलकात्याच्या ईडन गार्डन स्टेडियमवर खेळवले जातील. प्ले ऑफ आणि अंतिम सामने कुठे खेळवले जातील हे अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही. या स्पर्धेतील पहिला सामना १६ सप्टेंबरपासून खेळवला जाणार आहे. ५ व ७ ऑक्टोबरला प्ले ऑफचे सामने होणार आहेत, तर अंतिम सामना ८ ऑक्टोबरला होईल.




या स्पर्धेचे अधिकृत प्रसारण अधिकार सोनी स्पोर्ट्स नेटवर्ककडे आहेत. सोनी नेटवर्क चॅनेलवर इंडिया लीजेंड्स विरुद्ध द रेस्ट ऑफ द वर्ल्ड यांच्या सुरुवातीच्या सामन्याचे प्रक्षेपणदेखील पाहता येईल. त्याच वेळी सामन्याचे ऑनलाइन लाइव्ह स्ट्रीमिंग सोनी लाइव्ह अ‍ॅप आणि वेबसाइटवर उपलब्ध असेल. तथापि सामना थेट पाहण्यासाठी वापरकर्त्यांना सदस्यता आवश्यक असेल.

इंडिया महाराजा संघ : सौरव गांगुली (कर्णधार), वीरेंद्र सेहवाग, मोहम्मद कैफ, यूसुफ पठान, एस. बद्रीनाथ, इरफान पठान, पार्थिव पटेल, स्टुअर्ट बिन्नी, एस. श्रीसंत, हरभजन सिंग, नमन ओझा, अशोक डिंडा, प्रज्ञान ओझा, अजय जडेजा, आरपी सिंह, जोगिंदर शर्मा.

वर्ल्ड जाएंट्स संघ : इयॉन मॉर्गन (कर्णधार), लेंडल सिमन्स, हर्षल गिब्स, जॅक कॅलिस, सनथ जयसूर्या, मॅट प्रायर, नॅथन मॅक्कुलम, जाँण्टी रोड्स, मुथैया मुरलीधरन, डेल स्टेन, हेमिल्टन मसाकाद्जा, मुशरफे मुर्तजा, असगर अफगान, मिशेल जॉन्सन, ब्रेट ली, केविन ओ'ब्रायन, दिनेश रामदीन.

## यूएस ओपनमधून सानियाची माघार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**




भारताची प्रमुख टेनिसपटू सानिया मिर्झाने दुखापतीमुळे अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुहेरीतून माघार घेतली आहे. टोरंटो येथील कॅनेडियन खुल्या स्पर्धेदरम्यान सानियाला दुखापत झाली होती.

सानियाने म्हटले आहे की, चाचण्यांचा अहवाल आल्यानंतर दुखापत गंभीर असल्याचे स्पष्ट झाले. यातून बरे होण्यासाठी किमान एक आठवडा लागणार आहे. अत्यंत कठीण काळातून जात आहे. यामुळे मला निवृत्तीच्या विचारात काही बदल करावा लागेल. अर्थात, अजून निर्णय झालेला नाही. टोरंटो स्पर्धेत मेडिसन किजच्या साथीने सानियाने उपांत्य फेरी गाठली होती. त्यानंतर सानिया गेल्या आठवड्यात सिनसिनाटी खुल्या स्पर्धेतही खेळली. त्यामुळे सानियाची दुखापत आणखी बळावली आहे. दरम्यान, कोरोना लस घेतली नसल्याने ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये खेळण्यापासून वंचित राहिलेला नोवाक जोकोविच २९ ऑगस्टपासून सुरू होणार्‍या अमेरिकन ओपनलाही मुकणार आहे.

## तंदुरुस्त नीरज चोप्रा डायमंड लीगमध्ये खेळणार

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लुसाने येथे होणार्‍या डायमंड लीग अ‍ॅथलेटिक्स स्पर्धेत स्नायूंच्या दुखापतीतून सावरलेल्या नीरज चोप्राच्या कामगिरीकडे क्रीडाक्षेत्राचे लक्ष लागून राहिले आहे. या स्पर्धेत चांगली कामगिरी करून नीरजला पुढील महिन्यात झुरिच येथे होणार्‍या डायमंड लीग अंतिम स्पर्धेत खेळण्याची संधी मिळेल. नीरज सध्या चौथ्या स्थानावर आहे.



नीरजला दुखापतीमुळे राष्ट्रकुल स्पर्धेतून माघार घ्यावी लागली होती. स्पर्धेच्या दोन दिवस आधी त्याने माघारीचा निर्णय घेतला. त्याला चार आठवडे विश्रांतीचा सल्ला देण्यात आला होता.

डायमंड लीग आयोजकांनी १७ ऑगस्ट रोजीच जाहीर केलेल्या स्पर्धकांच्या यादीत नीरजच्या नावाचा समावेश होता. फक्त त्या वेळी आयोजकांनी त्याच्या नावापुढे तंदुरुस्तीवर नीरजचा सहभाग अवलंबून असल्याचे नमूद केले होते. नीरजनेच तंदुरुस्त असल्याचे जाहीर करून स्पर्धेतील सहभाग निश्चित केला आहे.

## बाबरची विराटशी तुलना नको -वसीम अक्रम



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

विराट कोहली गेली दोन वर्षे धावांसाठी झगडत आहे, परंतु बाबर आझमची जागतिक क्रिकेटमधील सार्वकालिक सर्वोत्तम म्हणून बिरुद मिरवणार्‍या विराटशी तुलना करणे घाईचे ठरेल, असे मत पाकिस्तानचा माजी कर्णधार वसिम अक्रमने व्यक्त केले आहे.


दुबईत होणार्‍या आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत रविवारी भारत आणि पाकिस्तान यांच्यात सलामीचा सामना होणार आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत विश्रांती घेणारा कोहली ताजातवाना होऊन या स्पर्धेसाठी सज्ज होत आहे.

या पार्श्वभूमीवर अक्रम म्हणाला की, विराटबाबत भारतीय चाहत्यांची टीका अनावश्यक आहे. तो एक सर्वोत्तम फलंदाज असल्याचे त्याने सिद्ध केले आहे. याचप्रमाणे त्याच्याकडे अजूनही सामने जिंकण्याची क्षमता आहे. भारतीय संघातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकीही त्याची गणना केली जाते.

तुलना करणे ही नैसर्गिक असते. चाहते इंझमाम उल हक, राहुल द्रविड आणि सचिन तेंडुलकर यांचीही तुलना करायचे. त्याआधी सुनील गावसकर, जावेद मियाँदाद, जी. विश्वनाथ आणि झहीर अब्बास यांचीही तुलना व्हायची. बाबरच्या खेळात सातत्य आहे. त्याचे फलंदाजीचे तंत्रसुद्धा उत्तम आहे. तो युवा कर्णधार असून तो वेगाने आत्मसात करतो, पण तरीही विराटशी त्याची तुलना करण्याची घाई करू नये, असे अक्रमने नमूद केले.

दरम्यान, गतवर्षीच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताच्या आघाडीच्या फळीला भेदणार्‍या शाहीन आफ्रिदीच्या अनुपस्थितीमुळे पाकिस्तानच्या चिंतेत भर पडल्याचे अक्रमने सांगितले. गुडघ्याच्या दुखापतीमुळे शाहीनने आशिया चषक स्पर्धेतून माघार घेतली आहे.

## भारताने फलंदाजीत आक्रमकता कायम राखावी -रवी शास्त्री



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताने ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये आपला आक्रमक फलंदाजीचा दृष्टिकोन कायम राखावा, असा सल्ला भारताचे माजी मुख्य प्रशिक्षक रवी शास्त्री यांनी दिला आहे. आशिया चषक स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर ते बोलत होते.

डावाच्या सुरुवातीला पारंपरिक बचावात्मक प्रवृत्तीमुळे गतवर्षीच्या ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारताचे आव्हान संपुष्टात आले. मुख्य प्रशिक्षक म्हणून शास्त्री यांच्या कार्यकाळातील ती अखेरची स्पर्धा होती. या संदर्भात शास्त्री म्हणाले की, भारताने वृत्तीत अद्याप बदल केलेला नाही. दृष्टिकोन बदलल्यावर कदाचित काही सामन्यांत भारताला अपयश येईल, परंतु विजयाची सुरुवात झाल्यावर आत्मविश्वास उंचावेल. विराट कोहली विश्रांतीनंतर आणि केएल राहुल दुखापतीतून सावरत आशिया चषक स्पर्धेसाठी पुनरागमन करीत आहेत. या दोघांबाबत शास्त्री म्हणाले, कोहली व राहुल पुरेशा प्रमाणात आयपीएल आणि ट्वेन्टी-२० सामने खेळले आहेत. त्यामुळे त्यांना पुनरागमन अवघड जाणार नाही. ऋषभ पंत, हार्दिक पांड्या व रवींद्र जडेजा यांच्यामुळे मधली फळीसुद्धा बळकट झाली आहे. त्यामुळे आघाडीची फळी लवकर कोसळली, तरी चिंता नाही.

## कारवाईचा फेरविचार करून बंदी उठवावी

### भारतीय फुटबॉल महासंघाची 'फिफा'ला विनंती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

कारवाईचा फेरविचार करून बंदी उठवावी, अशी विनंती अखिल भारतीय फुटबॉल महासंघाकडून (एआयएफएफ) 'फिफा'कडे करण्यात आली. सर्वोच्च न्यायालयाने प्रशासकीय समिती हटवल्यानंतर 'एआयएफएफ'कडून त्वरित ही मागणी करण्यात आली आहे.

'एआयएफएफ'चे हंगामी सचिव सुनांदो दास यांनी 'फिफा'चे सचिव फातमा सामौरा यांना बंदीच्या कारवाईवरील फेरविचार करावा, अशी विनंती केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने 'फिफा'च्या अटी मान्य करताना प्रशासकीय समिती हटवली आहे. 'एआयएफएफ'च्या समितीकडेच पूर्ण सूत्रे सोपविण्यात आली आहेत. याचा विचार करून 'एआयएफएफ'वरील निलंबनाच्या कारवाईचा फेरविचार करावा. निलंबनाची कारवाई जितक्या लवकर मागे घेतली जाईल तेवढे भारतातील फुटबॉलसाठी फायद्याचे ठरणार आहे, असेही दास यांनी 'फिफा'ला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

### 'एआयएफएफ'ची निवडणूक २ सप्टेंबरला

अखिल भारतीय फुटबॉल महासंघाची (एआयएफएफ) निवडणूक आता २ सप्टेंबर रोजी होणार असून यासाठी २५ ऑगस्टपासून नव्याने अर्ज भरण्यास सुरुवात होईल, अशी माहिती निवडणूक अधिकार्‍यांनी दिली. 'फिफा'च्या मागणीनुसार सर्वोच्च न्यायालयाने सोमवारीच 'एआयएफएफ'वरील प्रशासकीय समिती हटवण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार निवडणूक एका आठवड्याने पुढे ढकलण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशानंतर २४ तासांत निवडणूक निर्णय अधिकारी उमेश सिन्हा यांनी नव्या निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली.



**पनवेल : श्रीमद्‌भागवत कथा भक्तीरस ज्ञानयज्ञ सोहळा चिंध्रण येथे आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा १९ ते २६ ऑगस्ट या कालावधीत होणार असून यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या ज्ञानयज्ञ सोहळ्याला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी सोमवारी भेट देत दर्शन घेतले. या वेळी भाजप तालुका खजिनदार शिवाजी दुर्गे, भाजप नेते एकनाथ देशेकर, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, चिंध्रण ग्रामपंचायतीचे सदस्य तुषार दुर्गे, हिरामण पाटील, प्रकाश पाटील, अरुण पाटील, नामदेव भगत, मोतीराम टेंभे, राजेश फराद, गणपत पाटील, दशरथ दुर्गे, मोहन दुर्गे, तानाजी दुर्गे आदी उपस्थित होते.**



**खारघर : श्री संतसेना महाराज नाभिक वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने श्री संतसेना महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त मंगळवारी सेक्टर २१ येथील श्री तुळजाभवानी मंदिरात श्री सत्यनारायण महापुजेचे आयोजन करण्यात आले होते. पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या ठिकाणी भेट देत दर्शन घेतले. या वेळी स्थायी समितीचे माजी सभापती प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, रामजी बेरा, माजी नगरसेविका नेत्रा पाटील, भाजप शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, पप्पू खामकर, अमोल जाधव, आबा सोनावणे, दिनेश खिर्डे कर, विजय जाधव, अ‍ॅड. नरेश ठाकूर, राहुल शिंदे, समीर वाघमारे, पद्माकर शिरसाट, ज्ञानेश्वर सोनावणे, प्रमोद ठाकूर, पप्पू ठाकूर, कासीम अन्सारी, संतोष खामकर, विलास महाले, चंदेश्वर ठाकूर, राहुल खिर्डेकर, अमित आतकरे, मुंगाजी पटेल, जुगल शर्मा, लक्ष्मण ठाकूर, महम्मद रमजान आदी उपस्थित होते.**



**पनवेल : श्रावणी सोमवारचे औचित्य साधून वंदे मातरम् इको टॅक्सी संघटनेच्या वतीने गाढेश्वर मंदिरात सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले होते. भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट देत दर्शन घेतले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, नेरे वंदे मातरम इको टॅक्सी संघटनेचे अध्यक्ष अंकुश पाटील, दीपक नावडेकर, गजानन भागवत, संतोष म्हात्रे, मदन पारवे, निखील मढवी, मच्छींद्र पाटील, शुभ पाटील आदी उपस्थित होते.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com